परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव।'

# अमृत कुंभ

वर्ष ९ • अंक ४ • ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१५

## मुखपृष्ठाविषयी

दिवाळीचा सण हा प्रकाशाला प्रकट करण्याचा सण असल्याने त्याला प्रकाशाचे पर्व असेही म्हटले जाते. मनुष्याची अज्ञान अंध:कारापासून प्रकाशाकडे जाण्याची प्रवृत्ती द्वापर युगापासून आहे. म्हणूनच तो परमेश्वराकडे प्रार्थना करीत असतो - 'तमसो मा ज्योतिर्गमय...' मनुष्याची ही पुकार ऐकून कलियुगाचे अंती दिव्य ज्योति परमात्म्याचे अवतरण या सृष्टीवर होते. तो आपल्या दिव्य ज्योतिने, मनुष्याचा आत्मारूपी दीपक पुन्हा प्रज्वलित करतो. फलस्वरुप पुन्हा घरा-घरात सुख-शांती-समृद्धीची नित्य दिवाळी अनुभवाला येते.

मुखपृष्ठावरील चित्रात हाच भाव अतिशय सुंदररितीने ग्राफिकच्या सहाय्याने दर्शविण्यात आला आहे. ज्याची आत्मज्योति ईश्वरी ज्ञान व सहन राजयोगाने प्रज्ज्वलित झाली आहे, असा योगी व एक दीपक यांची तुलना करण्यात आली आहे. जसा वाऱ्याचा एक झोका सुद्धा दीपक विझवू शकतो. तसेच मायेचे (अर्थात ५ विकारांचे) वादळ आत्मारुपी दीपकाला हलचलमध्ये आणू शकते. म्हणूनच निरंतर योगी बनण्याची आवश्यकता आहे. योगबळानेच आपण मायाजीत बनू शकतो.

**अमृतकुंभच्या सर्व वाचकांना दिवाळीच्या तसेच नववर्षाच्या कोटी–कोटी मंगलकामना!**

- प्रकाशक अमृतकुंभ

## अंतरंग







१. अंतर्मनात ज्योति जागवा, मग होईल नित्य दिवाळी (संपादकीय) २
२. नित्य दिवाळी (कविता) ४
३. ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था... ५
४. मायेचा दास राही सदा उदास ८
५. आपल्या वाणीवर संयम ठेवणे, ही सुद्धा तपस्या आहे १२
६. परमात्म्याचा शोध आणि बोध (कविता) १४
७. सचित्र सेवावृत्त १५
८. विजयादशमी १९
९. संगमयुगी ब्राह्मण जीवनाची अंतिम स्थिती-कर्मातीत २१
१०. परमात्म्याचा सत्य परिचय २५
११. हे शेतकरी बांधवा! तूच तुझ्या भाग्याचा अधिकारी २६
१२. राजयोग- जीवन जगण्याची कला ३१


**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता** : संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३, • **वर्गणी पाठविण्याचा पत्ता** : बी.के.गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.
फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२ • E-mail :info@amrutkumbh.com.

डिमांड ड्राफ्ट 'अमृतकुंभ' या नावाने पाठवावा.

Printed and published by B. K. Godavari for Prajapita Brahma Kumaris Ishwariya Vishwa Vidyalaya, Light House, Wagle Estate, Thane (West)-400604 and printed at: Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Darga Road, Thane (West)-400601, **Editor :** B.K. Shivaji Chaudhari. Design & DTP by Media R&D Pvt. Ltd. 13, Amrut Madhura, Plot 3, Sector 3, RAC 28, Charkop, Kandivali (W), Mumbai- 400067

**वार्षिक वर्गणी रु. ६०/– • अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/- • आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**

**E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या www.amrutkumbh.com**

संपादकीय...

# अंतर्मनात ज्योति जागवा, मग होईल नित्य दिवाळी

सर्व सणांमध्ये दिवाळीइतका आनंददायक दुसरा सण नाही. या सणात स्त्रिया, पुरुष व बालके या सर्वांना आनंद होत असतो. आश्विन वद्य त्रयोदशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयापर्यंत हा महोत्सव सर्व भारतात मोठ्या थाटाने साजरा केला जातो. आता तर परदेशातही जेथे मोठ्या प्रमाणात भारतीय लोकांचे वास्तव्य आहे तेथे दिवाळीचा सण मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. त्यामुळे दिवाळी सणाला आता आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे. या सणात परस्परांकडे जाण्यायेण्याची व उपहाराची रूढी असल्याने, समाजात प्रेमभाव वृध्दिंगत होऊन सलोखा वाढतो. मुख्य म्हणजे बंधुभगिनीतील प्रेम आजन्म रहावे यासाठी पाचव्या दिवशी भाऊबीज साजरी केली जाते. हा दिवस बंधुभगिनींच्या भेटीचा असून, भगिनीकडून बंधूची मोठ्या प्रेमाने पूजा केली जाते. भाऊ तिला प्रेमाची भेट देतो.

वास्तविक दिवाळीच्या दिवसात मनुष्य आनंद अनुभवतो, तो केवळ तात्पुरत्या स्वरूपाचा असतो. कारण बहुतांशी तो भौतिक सुख-साधनांच्या प्राप्तीतून होत असतो. दिवाळीच्या निमित्ताने विविध वस्तू, कपडेलत्ते, सोने-नाणे, दागदागिने इत्यादी गोष्टींची खरेदी केली जाते. परंतु म्हणतात ना- 'नव्याचे नऊ दिवस.' त्याप्रमाणे त्या वस्तूंचा आनंदही अल्पकाळच टिकतो. **यावरून आपल्या लक्षात येईल की जीवनात अविनाशी सुख-शांती हवी असेल तर अंतर्मनात ज्योति (अर्थात आत्मज्योति) जागविण्याची आवश्यकता आहे. कारण आत्मा हा 'सत्-चित्-आनंद' स्वरूप आहे. तो सुख, शांती, आनंद, प्रेम, पवित्रता, ज्ञान व शक्ती या सातही गुणांचा अविनाशी स्त्रोत आहे. त्यामुळे त्याला जाणल्यानेच आपल्या जीवनात नित्य दिवाळी अनुभवाला येईल.** याचे वर्णन पुढीप्रमाणे करता येईल-

**अंतर्मनात ज्योति जागवी,<br>कधीच न विझणारी।<br>मग होईल नित्य दिवाळी,<br>श्रीलक्ष्मी येईल दारी।।**

अंतर्मनात ज्योति जागविण्यासाठी मुख्य दोन गोष्टींची आवश्यकता आहे. १) सत्य ज्ञान व २) सहज राजयोग. आत्मा, परमात्मा व सृष्टिचक्राचे ज्ञान जाणणे यालाच सत्य ज्ञान म्हटले जाते. तसेच आपल्या मनाला परमपिता परमात्म्याच्या दिव्य स्मृतीत लावणे, याला सहज राजयोग म्हटले जाते. योगाद्वारेच परमात्म्याच्या दिव्य ज्योतिचा प्रकाश प्राप्त करून, आत्मारूपी चैतन्य दीपकाला प्रकाशित करता येते. अशा प्रकारची संधी आपल्याला केवळ कल्पाचे अंती संगमयुगातच प्राप्त होते. याविषयीचे वर्णन पुढील गीताच्या ओळीत सुंदरपणे करण्यात आले आहे-

**ज्ञानघृताने भिजवूनि अपुल्या,<br>आत्मदीपांच्या वाती।<br>सहज राजयोगाद्वारे, चेतवी शिव<br>या ज्योति।।**

सर्वात महत्त्वाची तसेच अत्यानंदाची बाब म्हणजे आत्मारूपी चैतन्य दीप प्रज्वलित करण्याची वेळ हीच आहे. **वर्तमान समयी परमज्योति परमात्मा, साकार माध्यम प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीराचा आधार घेऊन, मनुष्य आत्म्यांना सत्य गीताज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देत आहेत. याद्वारेच मानव पुन्हा देवतातुल्य बनतो व सृष्टी स्वर्ग बनते. प्रत्येक कल्पाच्या अंती परमात्मा स्वर्ग स्थापनेचे दिव्य कर्तव्य करतो. म्हणूनच त्याला 'स्वर्गाचा रचयिता' असे म्हटले जाते.** याचेच प्रतीक म्हणून शिवमंदिरात जो दीपस्तंभ असतो, त्याच्या वरती एक मोठा दीपक असतो व त्याच्या खालच्या भागात अनेक छोटे-छोटे दीपक प्रज्वलित करण्यात येतात, या दीपस्तंभातील मोठा दीपक हा परमज्योति शिव परमात्म्याचे प्रतीक आहे व अन्य छोटे दीपक हे आत्म्यांचे प्रतीक आहे. तात्पर्य म्हणजे संगमयुगात दीपराज परमात्मा अवतरित होऊन; अनेक आत्मारूपी दीपराण्यांना पुन्हा जागृत करतो. म्हणून दिवाळीच्या दिवशी अनेक दीपक पेटविण्याची प्रथा आहे. परंतु त्यामागील आध्यात्मिक रहस्याचा मात्र आज सर्वांना विसर पडला आहे.



दिवाळीच्या सणाविषयी ज्या निरनिराळ्या कथा प्रचलित आहेत, त्यादेखील अलंकारिक भाषेत आहेत. त्यामागे सुद्धा आध्यात्मिक रहस्य दडलेले आहे. कसे ते आपण थोडक्यात पाहू या. सृष्टिचक्राच्या प्रारंभी सत्ययुगात श्रीलक्ष्मी व श्रीनारायणाचे अति सुखकारी राज्य या भारतभूमीवर होते. सत्ययुग व त्रेतायुगात राजा, राणी तसेच प्रजा सर्व दैवीगुणांनी संपन्न होते. मुख्य म्हणजे देवी-देवता संपूर्ण आत्मअभिमानी होत्या. या कालखंडाला स्वर्ग असे म्हटले जाते. स्वर्गीय सुख भोगताना, देवी-देवतांचे पुण्य क्षीण होत जाते परिणामतः त्या उच्च स्थितिपासून खाली येतात. द्वापरयुगाच्या प्रारंभी त्यांच्यात देहअभिमानाची प्रवेशता होते. या देहअभिमानातूनच पाच विकारांची (अर्थात मायेची) उत्पत्ती होते. त्यामुळे त्या देहअभिमानरूपी मायेच्या कैदेत बंदिस्त होतात. तेव्हापासून या जगात दुःख-अशांतीचे राज्य सुरू होते. या मायेचेच एक नाव 'नरकासूर' व दुसरे नाव 'बळीराजा' असे आहे. त्यांनीच श्रीलक्ष्मी व अन्य देवी-देवता, ज्यांना सत्ययुगात राज्यभाग्य प्राप्त होते, त्यांना या कलियुगी दुःखदायी जेलमध्ये कैद केले होते. **अशावेळी परमपिता परतात्मा शिव जो वास्तविक वामन अर्थात ज्योतिर्बिंदू आहे, या कलियुगी सृष्टीवर अवतरित होतो. तोच विकारांच्या जेलमध्ये बंदिस्त असलेल्या मनुष्य आत्म्यांना(अर्थात पूर्व देवी-देवतांना) ज्ञान व योगाच्या अमोघ शस्त्रांद्वारे मुक्त करतो आणि मायारूपी नरकासुराला मारून टाकतो अथवा कळीराजाला खाली पाताळात ढकलतो.**

तात्पर्य म्हणजे मायारूपी पाच विकारापासून मुक्त होण्यासाठी ईश्वरी 'सत्य ज्ञान' व योगाद्वारे 'आत्मदीप प्रज्वलित' करा. अर्थात सदा आत्मअभिमानी बना. म्हणजे निकट भविष्यात येणाऱ्या सत्ययुगात, आपणही श्रीलक्ष्मी व श्रीनारायणासारखे अवश्य बनू.

आज जगात जे अति दुःख व अशांतीचे वातावरण पसरले आहे, त्याला मुख्य कारण आहे. मनुष्यातील विकारांचे प्राबल्य. माणसातील आसुरी प्रवृत्ती इतक्या पराकोटीला गेल्या आहेत की मनुष्य आपल्या स्वार्थासाठी, मानव कुळाचाच विध्वंस करीत आहे. सत्ययुगात 'अहिंसा परमोधर्म' असे गायन होते; परंतु आज कलियुगाच्या अंती आतंकवादी संघटनांच्या बाबतीत 'हिंसा परमोधर्म' अशी विपरीत धारणा दिसून येते. यावरून आपल्या लक्षात येईल की देहअभिमानामुळेच मानव हा दानव बनतो. त्यामुळे खऱ्या नरकासुराला (अर्थात देहअभिमानाला) योगाग्निने जाळा; हीच खरी दिवाळी होय. मग आत्म्याची ज्योति एकरस जागल्याने, घरा-घरात अविनाशी सुख, शांती व समृद्धी अनुभवाला येईल. याचेच गायन केले जाते-

**आत्म दीप जगाये,**
**होऽ आत्म दीप जगाये।**
**घर-घर में हो सच्ची दिवाली,**
**ज्ञान-प्रकाश फैलाये।**

दिवाळीच्या दिवशी सर्वजण नवीन वस्त्रे परिधान करतात. परंतु वास्तविक खरे सौंदर्य आहे आत्म्याच्या दिव्य स्वरूपाचे. त्याची अनुभूती करण्यासाठी स्वमानरूपी (आत्म्याच्या सन्मानाची) वस्त्रे परिधान करा. तसेच ती केवळ दिवाळीच्या दिवशीच परिधान न करता, रोज परिधान करा अर्थात रोज नवीन स्वमान स्मृतींमध्ये ठेवून त्याचे स्वरूप बना. परमात्मा शिव पित्याने संगमयुगात आपली सर्व महिमा, आत्मारूपी आपल्या मुलांना दिली आहे. परमात्मा पित्याची महिमा तर आपण जाणतोच. त्या महिमेची स्मृती (उदाहरणार्थ सुखकर्ता, दुःखहर्ता, विश्वकल्याणकारी, भाग्यविधाता, सर्वशक्तिवान, सर्व गुणांचा सागर) धारण करा व त्यानुसार कर्म करा. तात्पर्य म्हणजे जसे पारलौकिक शिव पिता तसेच आपण, ही स्मृती वा स्वमान बाळगा. **सदैव लक्षात ठेवा की प्रत्येक आत्म्याचे अनादि व आदि स्वरूप हे संपूर्ण पवित्र व सत्तोप्रधान आहे. त्याप्रमाणे आता आपल्याला पुन्हा स्मृतिस्वरूप बनायचे आहे. ही श्रेष्ठ प्रेरणा देण्यासाठीच वास्तविक विविध सण व उत्सव साजरे केले जातात. परंतु साधारणतः 'पालथ्या घड्यावर पाणी' अशी परिस्थिती पाहायला मिळेते. आता हे सगळं बदलण्याची आवश्यकता आहे.**

त्यामुळे दरवर्षीप्रमाणे आता केवळ घरादाराची सफाई करू नका तर अंतर्मनाच्या सफाईकडे देखील लक्ष असू द्या. जोपर्यंत आत्मारूपी घरात विकारांची मलिनता आहे. तोपर्यंत आपले मन, मंदिर बनणार नाही व तेथे श्री लक्ष्मी येणार नाही. म्हणून सर्वप्रथम अंतर्मनाची सफाई करा. दिवाळीच्या निमित्ताने आपण रंगीबेरंगी तोरणे लावून, विद्युत रोषणाई करून संपूर्ण परिसर सजवतो. परंतु त्याबरोबर मनमंदिरात दिव्य गुणांची रोषणाई करायला विसरू

नका. त्यासाठी सदैव ही स्मृती ठेवा की, 'मी चैतन्य शालीग्राम या भृकुटीरूपी सिंहासनावर विराजमान आहे. मी आत्मा संपूर्ण पवित्र आहे' पवित्रता ही सर्व दिव्यगुणांची जननी असल्यामुळे, आपोआपच आपल्या जीवनात दिव्यगुणांची रोषणाई होत जाईल. तसेच दिवाळीच्या निमित्त आपण एक-दुसऱ्याला मिठाई वाटतो, भेटवस्तू देतो; परंतु केवळ एक सोपस्कार म्हणून तसे न करता, त्यामागे आत्मिक शुद्ध प्रेमाचा ओलावा असावा. सदैव मधुरतेची मिठाई सर्वांना वाटत राहावी. केवळ नरकचतुर्दशीच्या दिवशी अभ्यंगस्नान न करता, रोज अमृतवेळी योगस्नान करावे. अर्थात परमात्मा शिव पित्याची अति प्रेमपूर्वक आठवण करावी. तसेच नियमितपणे ईश्वरी ज्ञानमुरलीचे श्रवण वा पठण करून, ज्ञानस्नान करावे. त्यामुळेच आत्मारूपी सीतेची या कलियुगी शोकवाटिकेतून सुटका होते. त्याचबरोबर दिवाळीला केवळ फटाक्यांची आतिषबाजी न करता, परमात्म प्रत्यक्षतेची आतिषबाजी करावी. सर्वांना ईश्वरी संदेश द्यावा.

**यावरून आपल्या लक्षात आले असेल की दिवाळीच्या सर्व प्रथा व कथा आध्यात्मिक उन्नतीसाठी पोषक आहेत. त्यांच्यामागे अप्रत्यक्षपणे आध्यात्मिक ज्ञान सामावलेले आहे. ते ओळखून खरी दिवाळी साजरी करा. म्हणजे दिवाळीचा आनंद हा केवळ ५ दिवसापूरता मर्यादित न राहता, तो भविष्य २१ जन्मांकरिता अविनाशी वा शाश्वत स्वरूपाचा बनेल.** आजवर आपण दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर श्रीलक्ष्मीचे आवाहन करीत आलो, धनसंपत्तीसाठी तिची याचना करीत आलो. परंतु आता स्वर्ग रचयिता परमात्मा, आपल्याला श्रीलक्ष्मी आणि श्रीनारायण समान बनविण्यासाठी ज्ञान व योग शिकवित आहेत. **याचेच गायन केले जाते, 'नर ऐसी करनी करे, जो नर से श्री नारायण बने और नारी ऐसी करनी करे, जो नारी से श्री लक्ष्मी बने।' हे गायन दुसऱ्या कुणाचे नसून आपलेच आहे, हे सदैव लक्षात ठेवा.**

अशारितीने दिवाळीचा सण प्रामुख्याने ३ स्मृतींचे यादगार पर्व आहे. १) वर्तमान संगमयुगात आत्मज्योति जागविण्याचे २) भविष्यातील श्री लक्ष्मी, श्री नारायणाच्या राज्याभिषेकाचे (कारण याच दिवशी सत्ययुगात पहिल्यांदा खरी दिवाळी साजरी केली जाते.) ३) भक्तिमार्गात (द्वापरयुगापासून) धनदेवी श्री लक्ष्मीचे आवाहन व पूजन करण्याचे. त्यामुळे दिवाळीचा सण सर्वाधिक शुभ व मंगलकारी आहे यावेळीस आत्म्याच्या अनादि, आदि व पूज्य स्वरुपाची स्मृती विशेष रूपाने आपल्याला प्राप्त होते. अशा या संगमयुगातील हिरेतुल्य दिवाळीच्या आपल्या सर्वांना कोटी-कोटी मंगलकामना! तसेच नविन वर्षाच्या पद्मापद्म शुभभावना व शुभकामना!!!

**- ब्रह्माकुमार शिवाजी**




# नित्य दिवाळी

परमात्म्याची कृपा आगळी।
संगमी आम्हा नित्य दिवाळी।।धृ।।

शिवबाबांची ज्ञान मुरली।
अभ्यंग स्नान घाली माऊली।
शिवस्मृतीची ज्योत लाविली।
आत्मानंदाची उडे भुई नळी।।१।।

नूतन वस्त्रे वरदानांची।
आभूषणे ती दिव्य गुणांची।
आरास केली सत्कर्मांची।
मंगल मीलन अमृतवेळी।।२।।

सदा मीलन शिवबाबांशी।
सद्भाग्याच्या मिळती राशी।
पारावार नसे आनंदासी।
अवतरे स्वर्ग भूमंडळी।।३।।

आत्मिक दृष्टी हा दीपोत्सव।
पवित्रतेचा जणू होई वर्षाव।
हृदयी वसे सदा प्रेमभाव।
राहू बाबांच्या हृदयकमळी।।४।।

**– एक ब्रह्माकुमार**



भाग- ८

# ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

- ब्र. कु. रमेश शाह, गावदेवी (मुंबई)

आपण छोटीशी आत्मा आहोत ज्यामध्ये ५००० वर्षांचे अविनाशी संस्कार भरलेले आहेत. या छोट्याशा आत्म्याद्वारेच अनेक भाषा बनविण्यात आल्या आहेत. भारतात सुमारे ८५० भाषा असून, त्यापैकी बऱ्याच भाषा आता प्रायःलोप होत चालल्या आहेत. शिवबाबांनी आपल्याला सांगितले आहे की, भाषा हे मनातील भाव व्यक्त करण्याचे केवळ साधन आहे, साध्य नव्हे. ज्ञानसागर शिवबाबा सर्व साहित्याचे स्वामी आहेत. अर्थात, भाषेवर त्यांचे प्रभुत्त्व आहे. उदाहरणार्थ बाबांनी जसे एका मुरलीत म्हटले होते की, 'आसक्ती से माया आ सकती आहे।' तसेच अन्य एका मुरलीत म्हटले होते की, 'सुप्रीम रूह, रूहोंसे ....रूहरिहान करते है।' त्याप्रमाणे एका मुरलीत म्हटले आहे की, 'बाबा DOG को GOD बनाने आते है।' अशाच प्रकारे मीसुद्धा म्हणेन की, 'बाबा आपल्याला MAD पासून M.A.D. अर्थात मास्टर ऑफ डिवाईन ॲडमिनिस्ट्रेशन' बनविण्यासाठी आले आहोत, याच दृष्टिकोनातून आपण

**बाबांनी जसे एका मुरलीत म्हटले होते की, 'आसक्ती से माया आ सकती आहे।' तसेच अन्य एका मुरलीत म्हटले होते की, 'सुप्रीम रूह, रूहोंसे .... रूहरिहान करते है।'**

आपल्या यज्ञ इतिहासातून आणि पूर्वजांच्या जीवन कहाणीच्या आधारे बऱ्याच गोष्टी शिकू शकतो. तसेच दैवी सुशासनाचा अनुभव असणाऱ्यांकडून आपण शिकू शकतो. कारण अनुभवांच्या माध्यमातून जे शिक्षण मिळते, ते दुनियेत अन्य कुठेच मिळू शकत नाही.

इतिहास हा अनेक दृष्टिकोनातून लिहिला जाऊ शकतो. कालक्रम अनुसार मोगल साम्राज्य, मराठा साम्राज्य तसेच इंग्लंडचे हॅनोवर (Hanover) आणि स्टुअर्ट (Stuart) वंशाचा इतिहास उपलब्ध आहे. काही इतिहास गुण व कर्तव्य यावर आधारित आहेत. जसे रामायण हे श्रीरामाचे गुण व चरित्र यावर आधारित आहे. तर महाभारत हे पांडवांच्या चरित्रावर आधारित आहे. ज्याप्रमाणे आदरणीय भ्राता जगदीशजीने ब्रह्माबाबांची जीवन कहाणी लिहिली आहे त्याप्रमाणे यज्ञाचा इतिहास, यज्ञाचा विकास हा त्याच्या क्रमबद्धतेनुसार लिहिला जाऊ शकतो. तसेच यज्ञात अचल संपत्ती कशी घेण्यात आली, याबद्दलही लिहिले जाऊ शकते. सर्वात प्रथम आबू येथे यज्ञाद्वारे पांडव भवन खरेदी केले गेले. त्यानंतर ट्रस्टद्वारे नक्की लेक जवळील म्युझियमची खरेदी झाली तसेच लंडनमध्ये सर्वप्रथम टेनिसन रोडवर घर घेतले गेले. प्रत्येक खरेदीमागे त्याची आपली एक कहाणी आहे. ती विस्ताराने लिहायचं म्हटलं तर तो सुद्धा एक इतिहास बनेल. कारण ज्यांनी ईश्वरी सेवेसाठी आपले घर सफल केले किंवा सेवाकेंद्रासाठी जागा विकत घेण्यासाठी मेहनत केली, ते सर्वजण त्याविषयी जाणतात.

तात्पर्य म्हणजे दैवी अनुशासनाबाबत पिताश्री ब्रह्माबाबांचा, वरिष्ठ दादी तथा मोठ्या बहिणीचा जीवनवृत्तांत ऐकला तर आपल्याला खूप काही शिकायला मिळेल. त्यांच्या

जीवनापासून प्रेरणा प्राप्त करून, आपण श्रेष्ठ कर्तव्य केल्यास आपले जीवन खरोखर श्रेष्ठ बनवू शकतो. याच दृष्टिकोनातून मी ही लेखमाला लिहित आहे. यामध्ये पूर्वी लिहिलेल्या काही गोष्टींची पुनरावृत्ती होऊ शकते. परंतु ही पुनरावृत्ती विषयाच्या स्पष्टीकरणासाठी उपयुक्त असेल.

तसं पाहिलं तर मॅनेजमेंटमध्ये अनेक गोष्टींची आवश्यकता आहे. त्यात सर्वात महत्त्वाचा गुण आहे- समर्पणमयता. १९७७ मध्ये मुंबईत आपल्या ईश्वरी विश्व विद्यालयाद्वारे एक आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. तिचे शीर्षक होते- "Divinize The Man' मी या विषयावर पेपर सादर केला होता- 'समर्पणाद्वारा संपूर्णता' समर्पणमयता हा खूप मोठा गुण आहे; ज्यांच्यामध्ये सहनशीलता, नम्रता आहे, आपल्या ध्येयाप्रती समर्पित व्हायची भावना आहे, त्यांच्याकडेच समर्पणमयाता असते. या दुनियेत समर्पणभाव असणाऱ्या अनेकांनी आपल्या जीवनाचे बलिदान केले आहे. उदाहरणार्थ भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्यावेळी भगतसिंह, राजगुरू, सुखदेव यांनी देशभक्तीच्या भावनेने जीवनाचे बलिदान दिले. लौकिक जीवनातील ध्येय प्राप्तीसाठी काही समर्पित होतात. तर काही संन्यासी बनतात आणि काही देश-विदेशात परिभ्रमण करीत राहतात.

पिताश्री ब्रह्माबाबांमध्ये समर्पणमयतेचे संपूर्ण गुण होते. बाबा कलकत्त्याला हिरे-जवाहिरांचे मोठे व्यापारी होते. तसेच डायमंड मर्चंट असोसिएशनचे प्रमुख होते. नंतर सर्वकाही सोडून ते सिंध हैद्राबादमध्ये गीता ज्ञान ऐकवू लागले. एवढे विशाल परिवर्तन केवळ समर्पणमयता या गुणाच्या आधारेच होऊ शकते. केवळ बाबांनाच नाही तर त्यांच्या परिवाराने सुद्धा असेच विशाल परिवर्तन केले. बाबांची लौकिक पत्नी जशोदा माता यांच्या हातात घरचा सर्व कारभार होता. त्यामुळेच बाबांनी आपल्या हैद्राबादमधील घराला 'जशोदा भवन' असे नाव दिले होते. पुढे त्याच भवनात यज्ञाची स्थापना केली. खरोखर जशोदा माता किती भाग्यशाली म्हणाव्यात की त्यांचे नाव असलेल्या भवनात यज्ञाची स्थापना झाली. ऐवढंच नव्हे तर ज्यावेळेस बाबांनी आपले जीवन यज्ञात समर्पित केले त्याचवेळेस जशोदा मातानेही आपले जीवन समर्पित केले. आपल्यातील अहंकार नष्ट व्हावा म्हणून त्यांनी यज्ञामध्ये झाडू-पोछा व भांडी घासण्याची सेवा स्वतःकडे घेतली. बाबांची लौकिक सुपुत्री दादी निर्मलशांता यादेखील समर्पित झाल्या. त्यांनी आपल्या अनुभवात एकदा सांगितले होते की, त्यांना एक मोठी कढई साफ करायची होती. पण त्यांचा हात खालपर्यंत पोहोचत नव्हता. त्यामुळे त्या कढईमध्ये उतरून ती साफ करू लागल्या. तेव्हा बाबा तेथे पोहोचले आणि दादीजींना पाहून म्हणाले, मुली कढईमध्ये का डान्स करीत आहेस. स्टेजवर येऊन कर. अशाप्रकारे महान आत्म्यांनी संपूर्ण समर्पण भावनेच्या आधारे, आपला सारा अहंकार मिटवून यज्ञसेवा केली. अशाचप्रकारे ब्रह्माबाबांच्या पुत्रवधू दादी बृजेंद्राजी होत्या. बाबांच्या मोठ्या मुलाशी त्यांचा विवाह झाला होता. त्यावेळी एका राणीसाठी बनविलेले ३-४ लाखांचे दागिने बाबांनी त्यांना भेट म्हणून दिले होते.

यज्ञ स्थापनेच्या प्रारंभी ब्रह्माबाबांनी आपल्या घरी पत्र पाठविले होते. त्यात असे लिहिले होते की, 'अलिफ को मिला अल्लाह, बे को मिली झूठी बादशाही, आया तार अलिफको, हुआ रेल का राही' आणि त्यांनी आपले सर्वस्व शिवबाबांसमोर समर्पित केले. त्याचवेळी दादी बृजेंद्राजीसुद्धा स्वेच्छेने समर्पित झाल्या. त्यावेळी ब्रह्माबाबांनी घरातील सर्वांना बोलावून, मधोमध एक रुमाल ठेवला आणि सांगितले की यज्ञात ज्यांना जे समर्पित करायचे असेल ते त्यांनी करावे. बृजेंद्रा दादींनी त्याचवेळी आपले सर्व दागिने त्या रुमालावर टाकले होते. ही गोष्ट मला समजल्यावर मी दादीजींना विचारले की, दादीजी इतके बहुमोल दागिने तुम्ही यज्ञात समर्पित करताना तुमच्या मनात जराही संकोच अथवा वाईट वाटले नाही का? त्यावर दादीजी




**भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्यावेळी भगतसिंह, राजगुरू, सुखदेव यांनी देशभक्तीच्या भावनेने जीवनाचे बलिदान दिले. लौकिक जीवनातील ध्येय प्राप्तीसाठी काही समर्पित होतात.**

**आपल्या परम आदरणीय दादी प्रकाशमणीजी जेव्हा पहिल्यांदा जशोदा भवनमध्ये मुरली ऐकायला आल्या होत्या तेव्हा मुरली ऐकता-ऐकता त्या ध्यानावस्थेत गेल्या होत्या.**



म्हणाल्या की, वाईट वाटायचं काही कारणच नाही. उलट मी दागिन्यांच्या ओझ्यापासून हलके झाले. जणू काही अनेक बंधनातून मुक्त झाल्याचा मला अनुभव आला. फलस्वरूप माझा योग अधिक चांगला लागू लागला. तर असे आहे धन व दागिन्यांचे समर्पण.

आपल्या परम आदरणीय दादी प्रकाशमणीजी जेव्हा पहिल्यांदा जशोदा भवनमध्ये मुरली ऐकायला आल्या होत्या तेव्हा मुरली ऐकता-ऐकता त्या ध्यानावस्थेत गेल्या होत्या. मुरली क्लास संपला, सर्वजण निघून गेले तरी त्यांना काही कळले नाही. नंतर ब्रह्माबाबांनी शक्तिशाली दृष्टी देऊन त्यांना ध्यान अवस्थेतून भानावर आणले होते. दादीजींचे लौकिक पिता ज्योतिषी होते. त्यांनी दादीजींच्या लहानपणीच जाणले होते की त्यांची मुलगी आध्यात्मिक क्षेत्रात खूप प्रगती करून आपले नाव उज्ज्वल करील.

म्हणूनच दादीजी यज्ञात समर्पित होण्यासाठी आल्या तेव्हा त्यांच्या वडिलांनी अगदी आनंदाने समर्पणासाठी चिठ्ठी दिली. दादीजींच्या शब्दात सांगायचे झाले तर जेव्हापासून त्यांच्या वडिलांनी समर्पणासाठी संमतीपत्र दिले त्यानंतर कधीही आपल्या वडिलांच्या घरी रात्री थांबल्या नाहीत. हा त्यांचा शिवबाबांप्रति असणारा समर्पण भाव होता. आजच्या काळात समर्पित भाऊ-बहिणींना त्यांच्या लौकिक घरी जाण्यासाठी परवानगी मिळते ती एक वेगळी गोष्ट आहे.

याचप्रमाणे दादा विश्व किशोरजींच्या बद्दल लिहिता येईल. लौकिक संबंधात ते ब्रह्माबाबाचे पुतणे होते. त्यांचाही कलकत्त्यामध्ये हिरे-जवाहिरांचा व्यवसाय होता. ते आपली पत्नी संतरी व मुलगा खुशाल यांच्यासह सुखासमाधानाने जीवन व्यतीत करीत होते. परंतु जेव्हा ब्रह्माबाबांनी आपले जीवन शिवबाबांच्या यज्ञात समर्पित केले तेव्हा बाबांनी त्यांना पत्र लिहिले. बाबांचे पत्र मिळताक्षणीच त्यांनी आपला व्यवसाय गुंडाळला आणि सिंध हैद्राबादला येऊन यज्ञामध्ये समर्पित झाले. ते नेहमी बाबांचे उजवे हात म्हणून राहिले आणि शेवटपर्यंत बाबांच्या प्रत्येक कर्मात संपूर्ण मदतगार बनले. मातेश्वरीजी आजारपणात जेव्हा मुंबईत होत्या, तेव्हा दादांनी आमची लौकिक बहिण डॉ. अनिलाबरोबर मातेश्वरीजींचे ऑपरेशन व ट्रीटमेंट याबाबत सल्लामसलत करून सर्व गोष्टी ठरविल्या. दादा विश्वकिशोर ब्रह्माबाबांची पण खूप काळजी घेत. जेव्हा जेव्हा बाबा मुंबईहून आबूला किंवा आबूहून मुंबईला जात तेव्हा दादा स्वतः खास रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क करून, दिल्ली मेल व गुजरात मेलचे ए.सी. डब्बे (त्यावेळचे) पाहत असत आणि लक्ष ठेवीत असत की बाबांची सीट, चाकाच्या वर तर येत नाही ना? जेणेकरून बाबांना त्रास होता कामा नये तसेच बाबांचा प्रवास आरामदायी व्हावा.

एकदा मी उषाजी बरोबर अशाप्रकारे फर्स्टक्लास केबीनमधून तशा प्रकारच्या सीटवर प्रवास केला, तेव्हा मला समजले की, दादा, बाबांचा प्रवास सुखकर होण्यासाठी किती मेहनत करीत.

दादा विश्वकिशोरजी इतके समर्पित बुद्धीचे व विश्वासपात्र होते की, ज्यामुळे बाबांनी त्यांच्या नावे पांडवभवनाची खरेदी केली होती परंतु कालांतराने त्यांनी बाबांसमोर आपला विनंती अर्ज ठेवला की, बाबा आता यज्ञात अन्य सुशिक्षित भाऊ समर्पित झालेले आहेत अणि म्हणून मी आता भविष्यातील सेवेच्या नियोजनार्थ नवीन शरीर घेऊ इच्छितो. त्यांचे प्रोस्टेटचे एक छोटेसे ऑपरेशन मुंबईत झाले. त्यांची इच्छा होती की, ऑपरेशन टेबलवरच त्यांचा शरीर त्याग व्हावा. परंतु बाबांनी त्यांना ५ दिवस जीवनदान देऊन नंतर शरीरी सोडण्याची अनुमति दिली.

ब्राह्मण जीवनात ज्याप्रमाणे पवित्रता ही आधारस्तंभ आहे त्याचप्रमाणे समर्पणमयता सुद्धा आधारस्तंभ आहे. कारण जेथे समर्पण नाही तेथे एकाग्रता होऊ शकत नाही. आणि जेथे एकाग्रता नाही तेथे संचालनाचे कार्य होऊ शकत नाही. **यासाठी एक स्लोगन लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, 'मेरा तो एक शिवबाबा दूसरा न कोई।' समर्पण बुद्धी तेव्हाच सात्विक बनेल जेव्हा शिवबाबाची अव्यभिचारी याद निरंतर असेल...**

**(भावानुवाद - बी. के. जयश्रीबहेन. विक्रोळी, मुंबई)**

# मायेचा दास राही सदा उदास

- ब्र.कु. गुणवंत पाटील, बिबवेवाडी (पुणे)

आज समाजातील सर्व वर्गाचे लोक मग तो गरीब असो वा श्रीमंत दुःखी आहेत; अशांत आहेत, उदास आहेत. गरीब हा भौतिक सुविधांच्या अभावामुळे तणावग्रस्त, दुःखी आहे, तर श्रीमंत हा अधिक धन, दौलत जमविण्याच्या हव्यासापोटी रात्री नीट झोपूही शकत नाही. प्रत्यक्षात आज माणूस बहिर्मुखी झाला आहे. त्याला खरं तर अंतर्मुखी होण्याची गरज आहे. खरी सुख-शांती बाहेर नाही तर आतच आहे. श्रीमंतांना सुखमय जीवन कसे जगावे हेच कळत नाही. खरी सुख-शांती हाच आत्मिक खजिना आहे, हे त्यांच्या ध्यानी-मनीही नसते. त्यामुळे खऱ्या सुख-शांतीला ते वंचित राहतात, म्हणून सदा उदास राहतात. **धनाचा लोभ व अन्य विकार ही माया आहे. या मायेच्या अधीन होणारा, वश होणारा, तिचा दास होणारा मग खुश कसा राहणार? म्हणून मायाजीत बनून प्रसन्न चित्ताने जगणे ही काळाची गरज आहे.** नेहमी हसत राहिले पाहिजे. कधी कुणी व्यक्ती, वातावरण वा इतर कारणांनी जर तुमचं हसणं संपलं तर ती तुमच्या जीवनातील मोठी हार होईल.

हसण्याचा अर्थ केवळ बाहेरून हसणं नाही, तर आतून हृदयातून हसणं आहे. आतून हसणं बंद झालं की समजा आपला पराभव झाला. केवळ या एका जाणीवेने मनुष्य सारे आयुष्य हसत, संतुष्टतेने जगण्याचा प्रयत्न करतो. हे हसणेच विवेकी आहे. सत्य-असत्यातील फरक जाणणे म्हणजे विवेक. विवेकीलाच खरे आणि खोटे हास्य कळते. जो जीवनात असे हसायला शिकला तोच यथार्थ जगायला शिकला. अशी व्यक्ती मग उदास कशी होईल? त्याच्या बाबतीत एवढेच म्हणता येईल की He Counts his life by smiles and not by tears.

## व्यसनांचा दास हा सदा उदास

वाईट सवयी, व्यसनांनी आमचे प्रचंड नुकसान होते. तंबाखू, धुम्रपान, मद्यपान यांनी आमचे स्वास्थ्य तर बिघडतेच पण त्याबरोबरच आर्थिक हानी होते, सामाजिक पतही कमी होते. आम्ही शारीरिक, मानसिक रोगांचे बळी होतो. पारिवारिक शांती धोक्यात येते, कधी अकाली मृत्यू संभवतो. एकदा या व्यसनांच्या दुष्ट चक्रात फसलो की लाख प्रयत्न करूनही मोठ्या मुश्किलीने व्यसनमुक्ती होते. निश्चय, निर्धाराचा अभाव असला तर व्यसनाचा दास सदाच उदास असतो, दुःख, अशांती हा त्याच्या परावश आयुष्याचा स्थायीभाव होतो. आयुष्याला विटलेल्या अशा व्यक्तीला कुणी त्राता भेटला की मग व्यसनमुक्तीची ओढ लागते, स्व-परिवर्तनाची आस लागते.

अशीच एक पीडित व्यक्ती एकाच्या सल्ल्याने एका संताकडे गेली आणि म्हणाली, 'मला व्यसनमुक्त करा.' परंतु संताने त्याकडे दुर्लक्ष केले. ती व्यक्ती ही मोठी जिद्दी होती. तिने संताला नेटाने भेटणं चालू ठेवले. संतानेही तिला रोज भेटायचे टाळले. एक दिवस जेव्हा ती व्यक्ती हातघाईवर आली तेव्हा तो संत तिला म्हणाला, तुला काय मार्ग दाखवू? तू फक्त ४० दिवसाचा सोबती आहेस. एवढ्या थोड्या दिवसात तू कसा सुधारशील? ती व्यक्ती घाबरून गेली, निराश झाली. त्यानंतर ती व्यक्ती घाबरून पश्चातापाने रोज ईश्वराची पूजा-अर्चा करू लागली. चाळीस दिवस संपत आले.एक दिवस बाकी असताना संताने तिला जवळ बोलावले आणि विचारले, या चाळीस दिवसात तू किती प्रमाणात व्यसने वा विकर्म केलीत? ती व्यक्ती हैराण होऊन म्हणाली, महाराज, या ३९ दिवसांत विकर्म तर काय माझ्या मनात वाईट विचारही आले नाहीत. मनात फक्त एक मृत्यूचीच भीती छळत होती.

**तेव्हा संताने त्याला समजावले की वाईट कृत्यांपासून वाचण्याचा एकच उपाय आहे तो म्हणजे प्रत्येक क्षणी मृत्यूची भीती वाटू द्या आणि ज्यामुळे मनःशांती व सुख मिळेल अशीच सत्कृत्य करा. त्या व्यक्तिला आपल्या सुधारणेचा, परिवर्तनाचा मार्ग सापडला. तिने संताचे आभार मानले, आणि सन्मार्गाने जगण्याचा निर्धार केला.**

## श्रेष्ठ चिंतनाचे महत्त्व

वास्तविक मनुष्य जीवन क्षणभंगुर आहे. म्हणून रोज शुभचिंतन आणि सत्कर्म केली पाहिजेत. निर्विकारी, पुण्यात्मा होण्याची हीच वाट आहे. या कलियुगी संसारात पावलापावलावर काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार या विकारांची जाळी पसरली आहेत. या जाळ्यात फसून आपले सावज होते. माया शिकारी या सावजाची पारध करण्यासाठी सदा टपलेली असते. म्हणून सावध राहिलं पाहिजे.

**चिंतन हे स्वपरिवर्तनासाठी व्हावे. श्रेष्ठ चिंतन हे तेव्हाच सार्थ होते जेव्हा ते तुमचे चरित्र घडवते आणि श्रेष्ठ चरित्राची सार्थकता ही तुमच्या व्यवहारातून, आचरणातून होते.**



हे विकार ओझ्यासारखे असतात. शिरावर ओझं असेल तर वाटचाल अवघड होईल. विकारी, रोगी, पछाडलेला प्रभूदर्शनाची अनुभूति कशी करू शकेल? प्रभूदर्शनासाठी भोंगी नाही तर योगी होण्याची गरज आहे.

विकारांनी आमचं आत्मबल क्षीण झालं आहे. ते वाढविण्यासाठी स्वचिंतनाची, योगाची गरज आहे. चिंतन तुम्हाला नम्र बनवते. चिंतन हे स्वपरिवर्तनासाठी व्हावे. श्रेष्ठ चिंतन हे तेव्हाच सार्थ होते जेव्हा ते तुमचे चरित्र घडवते आणि श्रेष्ठ चरित्राची सार्थकता ही तुमच्या व्यवहारातून, आचरणातून होते. चिंतनातून होणारा अहंकार व्यर्थ आहे. त्याचा त्याग केला पाहिजे. म्हणून अहंकाराची तुष्टि करणारे चिंतन अनुचितच नव्हे तर निषेधार्थही आहे. तर्क-कुर्तकांच्या आधारे होणाऱ्या चिंतनातून समर्थ चरित्र घडणार नाही म्हणून आपले चिंतन हे शुद्ध, तर्क-कुतर्करहित व्हावे. श्रेष्ठ चरित्रच इतरांना प्रेरणा आणि प्रकाश देईल. आपले आचरण हे निष्कपट प्रामाणिक, निर्मळ असावे. तेथे विरोधी तत्वांशी जीवन मूल्यांशी तडजोड नको.

## संपूर्ण निर्विकारी बनण्याची आवश्यकता

माणसाची ओळख त्याच्या आचरणातून होते. आपले आदर्श, ध्येय श्रेष्ठ हवे. संगाकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. संगाबरोबरच अंतरंगही जपले पाहिजे. महात्मा महावीर आपल्या शिष्यांना कायम श्रेष्ठ चिंतनासाठी प्रवृत्त करीत. कारण ते जाणत की चिंतनातून आज्ञाकारिता वाढते. त्यांना ज्ञानचर्चा फार आवडे. एकदा अशाच एका ज्ञानचर्चेत त्यांनी आपल्या शिष्यांना विचारले की मनुष्याचे पतन का होते? शिष्य विचार करू लागले. एकाने सांगितले अहंकार, तर दुसऱ्याने काम विकारामुळे पतन होते, असे सांगितले. लोभ हे पतनाचे मूळ असल्याने एकाने नोंदवले. तर क्रोधामुळे मनुष्याची अधोगति होते असे मत काहींनी दिले.

सर्वांची मते जाणून घेतल्यानंतर महावीर म्हणाले. समजा माझ्याकडे एक कमंडलु आहे. त्यात बरेच पाणी मावते. जर कमंडलु नदीत सोडून दिले तर बुडेल काय? शिष्यांनी नकारार्थी मान हलवली. मग महावीरांनी विचारले की जर त्यास छिद्र असेल तर? तेव्हा शिष्य म्हणाले की मग ते जरुर बुडेल. महावीरांनी पुनः विचारले की समजा हे छिद्र डावीकडे असेल तर? तेव्हा एक शिष्य म्हणाला, छिद्र कोणत्याही बाजूस असू दे कमंडलू नक्की बुडणार. **महावीरांनी मग समजावले की मनुष्य जीवन हे या भांड्यासारखे आहे. जर त्याला दुर्गुणासारखे छिद्र असेल तर त्याचे पतन नक्की होणार. काम, क्रोध, मोह, लाभ, अहंकार या विकारात काहीच फरक नाही. थोडक्यात, दुर्गुण कोणताही असो मनुष्याला संपविण्यास पुरेसा आहे. दुर्गुणाने माणसांची विश्वसनीयता संपून जाते. जवळचेही त्याला टाळू लागतात. विकारांमुळे जीवनमूल्यांचा ऱ्हास होतो. माणसाची पत घसरते. असा माणूस समाजात सुखी राहील काय? अशा उदास माणसाच्या वाट्याला उपमर्दच येणार.**

म्हणून स्वतःच्या दुर्गुणांवर दोषांवर नियंत्रण मिळवणे आणि त्या अवगुणांचे परिवर्तन करणे हीच आपली साधना व्हावी. मग या साधनेची सिद्धी आहे आपले सुधारलेले श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व. दैवीगुण आणि शक्ती हीच आत्म्याची खरी संपदा आहे, संपत्ती आहे. आपण ईश्वराची मुलेच ही संपदा प्राप्त करू शकतो. जगातील इतर ऐश्वर्य, भौतिक समृद्धी हा केवळ गळफास आहे. त्याने काय साध्य होणार!

एखादा योद्धा जेव्हा इतर योद्ध्यांना पराजीत करून जिंकतो, तो काही त्याचा खरा पराक्रम नाही. खरंतर आज प्रत्येकाचे स्वतःशीच युद्ध चालू आहे. ज्याने स्वतःचा अहंकार जिंकला तोच खरा विजयी योद्धा. सिकंदराला सारे जग जिंकल्याचा अहंकार होता. पण मरणाच्या दारात पडलेल्या सिकंदरालाही कबूल करावे लागले मी रिकाम्या हातांनीच चाललो आहे, हे जगाला कळू द्या.

## जीवनात सकारात्मक दृष्टिकोनाचे महत्त्व

जीवनात दृष्टिकोन फार महत्त्वाचा असतो. परिस्थितीमुळे फारशा समस्या येत नाहीत, पण अधिक तर समस्या ह्या परिस्थितीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातून उद्भवतात. म्हणून म्हटले जाते-



**सिकंदराला सारे जग जिंकल्याचा अहंकार होता. पण मरणाच्या दारात पडलेल्या सिकंदरालाही कबूल करावे लागले मी रिकाम्या हातांनीच चाललो आहे, हे जगाला कळू द्या.**

**सोच को बदलो तो**
**सितारे बदल जायेंगे।**
**नजर को बदलो तो**
**नजारे बदल जायेंगे।**
**कश्तियों को बदलनेकी जरूरत नहीं**
**दिशाओं को बदल दो**
**किनारे बदल जायेंगे।।**

सन्मार्गाने चालणारा मनुष्य हा त्याच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे कधीच चुकत नाही. कारण त्याचे पाय सदा जमिनीवर असतात. तो इतरांपेक्षा स्वतःला जास्त ओळखतो. आणि स्वतःशी प्रामाणिक राहतो. त्यामुळे समस्या येण्यापूर्वीच सुटतात. अहंकार केव्हाही वाईट. अहंकाराच्या हवेत तरंगणारा मात्र नेहमीच चुकतो. **अहंकाराने देवताही दानव बनतो, पण नम्रतेने मानवही देवता बनतो. पास्कल नावाच्या तत्त्वचिंतकाने व्यक्त केलेली व्यथा, चिंता मोठी विदारक आहे. तो म्हणतो माणसं स्वतःमध्ये रमत नाहीत, एका जागी थांबून आत्मबोध घेत नाहीत. वस्तूंचा हव्यास आणि गर्दीचे वेड यामुळे आपले अस्तित्त्व गौण ठरते हे त्यांना उमगत नाही. त्यामुळे आपल्यातील देवत्त्वच काय, माणूसपणही हरवून बसले आहेत.**

तुमच्या गरजा पुऱ्या झाल्या की तुम्ही खुश होता पण तुमच्या लालसा, इच्छा अपुऱ्या राहिल्या की, तुम्ही उदास होता. म्हणून इच्छांबरोबरच गरजाही कमी केल्या पाहिजेत. इच्छा तुम्हाला अच्छा (चांगला) बनू देत नाही.

आजकल प्रदर्शन करण्यात लोक जास्त आस्था दाखवितात. बाह्य रंगरंगोटी, प्रसाधनांनी आपले बाह्यरूप प्रेक्षणीय आकर्षक होते. पण त्यामुळे आपले अंतरंग बदलले असे होत नाही. अंतरंग बदलते ते चिंतन-मननातूनच. त्यासाठी आत्मा, परमात्मा आणि परमधाम हे मनाचे विषय झाले पाहिजेत.

## ईश्वरी आज्ञापालनेचे महत्त्व

ईश्वरी ज्ञानाच्या चिंतनातून तुम्ही आज्ञाकारी बनता. अव्यक्त बापदादांनी मुरलीतून आज्ञेचे स्वरूप अनेकदा स्पष्ट केले आहे. काही आज्ञा वानगीदाखल सांगता येतील.

१. अमृतवेळी उठून शक्तिशाली याद करणे
२. प्रत्येक कर्म कर्मयोगी होऊन करणे
३. प्रत्येक कर्म निमित्तभावाने करणे
४. मुरलीचे नित्य वाचन वा श्रवण

अशाच दृष्टी-वृत्तीच्या संदर्भात, धारणेच्या रूपात आज्ञा वा सूचना दिल्या आहेत. पण त्यांच्या यथा-योग्य पालनात दुर्लक्ष, टाळाटाळ, चालढकल, आळस झाला की अवज्ञा होते. त्यामुळे कधी डबल लाइट स्थितीचा अनुभव तर कधी अवज्ञेचा बोझ खाली खेचतो, विचलित करतो. या अवज्ञेचे स्वरूप वेगवेगळे असते. कधी मोठे पाप घडते, तर कधी मोठी चूक वा घोडचूक होते. या पलिकडेही छोट्या-मोठ्या स्वरूपाच्या अवज्ञा होतच राहतात. अवज्ञा करणाऱ्याचे मन भारी होते. जे हलकेपण अनुभवाला यायला हवे, तसे होत नाही.

याउलट आज्ञाकारी हा अतींद्रिय सुखाचा, खुशी, संपन्नता व शांतीचा अनुभव करतो. बापद्वारा प्राप्त वरदानांचा लाभ तोच घेऊ शकतो. त्याच्या प्रत्येक पावलावर बापदादांचा आशीर्वाद असतो. त्यामुळे त्याचे प्रत्येक कर्म सिद्ध होते. कर्माचे फळ आहे, सफलता आणि संतुष्टता.

तसे आज्ञापालन अवघड नाही. प्रत्येक पावलाची आज्ञा स्पष्ट आहे. त्याप्रमाणे चालणे वागणे हे तर त्याहून सहज आहे. प्रत्येक आज्ञा हे पिताश्री ब्रह्माबाबांचे पाऊल आहे. सप्तपदीच्या विधीत पत्नी ही पतीच्या पावलावर पाऊल टाकत अग्नीला साक्षी ठेवून फेरे घेते. हा विश्वास तिला आयुष्यभर पुरतो. सात फेरे ती अंधविश्वासाने घेत नाही. पतीनिष्ठा तिला जीवनभर ऊर्जा पुरवते. तसेच शिवपित्याच्या आज्ञा पालनात ब्रह्माबाबांना 'फॉलो फादर' करणे सहज व्हावे; हे अनुकरण कल्याणकारी आहे.

**शिवबाबांची मुरली ही ब्रह्मा-वत्सांसाठी मर्यादा आहे. आपले संकल्प बोल, कर्म संबंध-संपर्क कसा असावा याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे मुरली. त्यात बाबांनी मर्यादांची लक्ष्मणरेखा अधोरेखित केली आहे.** ही लक्ष्मण-रेखा जेव्हा सीतेने ओलांडली तेव्हा ती केवढ्या संकटात सापडली. त्यातूनच केवढे रामायण घडले याचे भान ठेवले पाहिजे.

**प्रत्येक आज्ञा हे पिताश्री ब्रह्माबाबांचे पाऊल आहे. सप्तपदीच्या विधीत पत्नी ही पतीच्या पावलावर पाऊल टाकत अग्नीला साक्षी ठेवून फेरे घेते. हा विश्वास तिला आयुष्यभर पुरतो. सात फेरे ती अंधविश्वासाने घेत नाही. पतीनिष्ठा तिला जीवनभर ऊर्जा पुरवते.**



पहिल्या क्रमांकाची आज्ञाकारी मुले आहेत, स्वतः स्मृतिस्वरूप. त्यांचा प्रत्येक संकल्प, बोल, कर्म बापाच्या आज्ञेप्रमाणे होते. अमृतवेळेपासून त्यांचा दिवस सुरू होतो. श्रीमता प्रमाणे कर्म होत असल्याने त्यात मेहनत होत नाही, कर्म सफलतेने संतुष्टी मिळते. दुसऱ्या क्रमांकाच्या आज्ञाकारीचे कर्म कधी स्मृतीच्या आधाराने होते तर कधी कर्म झाल्यावर स्मृती येते. अनेक इच्छांच्या गर्दीत संतुष्टी स्थायी नसते. बुद्धीमध्ये अपेक्षांचे ओझे जास्त असते. त्यामुळे नाराजी, असंतुष्टी वाढते.

तिसऱ्या प्रकारच्या आज्ञाकारीचा तर विचारच नको, कारण तो आत्मा अवज्ञा करण्यातच धन्यता मानतो. त्यामुळे सफलता तर सोडाच पण संबंध-संपर्कातही कोणी संतुष्ट नसतो. जुने स्वभाव संस्कार यांचा त्याच्यावर मोठा प्रभाव असतो. त्यामुळे हिसाब-किताब मोठा होतो. गैरसमज, कारणांचे नीट आकलन न झाल्याने नाराजी, उदासी वाढते.

बऱ्याच वेळा आळसामुळे ईश्वरी आज्ञापालनात कुचराई वा चालढकल होते. मग ही अवज्ञा कुसळासारखी खुपत राहते, छळते. कधी कोणतेही विकर्म न होताही जुने हिशेब वाढत जाऊन तुमची अस्वस्थता वाढेल. कधी योगात मन लागेल, कधी लागणार नाही. सेवेचा मूड (मनःस्थिती) राहील वा राहणार नाही अशी द्विधा अवस्था होईल. ही तुमची उदासीनता, खिन्नता वाढवील. त्यामुळे ज्ञानाने प्राप्त होणाऱ्या शांतीच्या जागी नीरसता, बेचैनी, सन्नाटा अवती-भोवती अनुभवाल, एकांताच्या विचाराने मन बेचैन होईल. अवज्ञा केल्याचे वा कर्म ओझं खेचत असल्याची ही लक्षणे आहेत.

आळस, अलबेलापन या सर्व अवस्थांना जबाबदार आहे. खरंतर सर्व अवगुणांची जननी आळस आहे. एकदा सर्व अवगुणांना कंटाळून मायेने संन्यास घ्यायचे ठरविले. तिने आपली सर्व संपत्ती विकायला काढली. तिच्या खरेदीसाठी मग तोबा गर्दी उसळली. व्यसने, ईर्ष्या, द्वेष, निंदा, चुगली, बेइमानी या गोष्टी लोकांना खूप आवडल्या. त्यांनी वाटेल त्या भावाने त्या गोष्टी विकत घेतल्या. हा हा म्हणता सारा माल विकला गेला. फक्त एकच वस्तू शिल्लक राहिली, जी मायेला विकायची नव्हती.

'ही वस्तू का विकत नाहीस? विकून निश्चिंत हो की', एक जण म्हणाला. माया असे म्हणाली— ही माझी सर्वात प्रिय, किंमती आणि चमत्कारी वस्तू आहे. जे काही सारं मी विकलं ते मी पुनः हिच्या मदतीने मिळवू शकते. संन्यासात मन लागले नाही की या वस्तूच्या मदतीने पुनः मला धंदा सुरू करता येईल. ही वस्तू विकली तर माझं अस्तित्त्वच धोक्यात येईल. पुनःपुनः विचारल्यावर मायेने त्या वस्तूचे नाव सांगितले— आळस! आळस असेल तर मी जे इच्छिल ते सर्व प्राप्त होईल. आळस या एका अवगुणाने सर्व अवगुण धारण करता येतील.

**म्हणून आळस संपवला पाहिजे. सर्व दुर्गुणांचे बीज आहे, आळस! कोणी कितीही विकास करू दे पण तो आळशी असेल तर त्याचे अधःपतन निश्चित आहे. आळशी व्यक्तीचे भवितव्य म्हणून अंधःकारमयच आहे. म्हणून आयुष्यावर प्रेम करणाऱ्यांनी आळसात कधीही आपला अमूल्य वेळ गमवू नये. आळशी हाच खरा मायेचा दास आहे. आळशी हा सदा उदास म्हणूनच राहील.**

### सुखी जीवनाचा मार्ग

आज समाजात ज्येष्ठांची अवस्था मोठी खराब आहे. यावेळी तुम्हाला उदास, दुःखी, खिन्न करणारे अनेक घटक वेगानं कार्यान्वित होतात. आयुष्याची ही संध्याकाळ सुखमय करण्याचा पुरुषार्थ आहे- 'मरजीवा जीवन' अर्थात देहअभियानाचा त्याग करून, आत्मअभियानी बनणं. त्यासाठी मरणाआधीच मरायला शिकलं पाहिजे. मरजीवा कधी उदास, दुःखी होणार नाही कारण तो अविनाशी सुख-शांतीचा अधिकारी असतो. यावेळी सर्वशक्तिमान परमात्मा त्याच्या सोबत असतो. तुम्हाला त्यासाठी फक्त निर्मोही, निर्विकारी व्हायचं आहे, देहभान विसरायचं आहे आणि आत्म-अभिमानी होऊन एक परमात्म्याच्या स्मृतीत मग्न व्हायचं आहे. मग ना तुम्ही मायेचा दास व्हाल, ना कधी उदास! ■■



# आपल्या वाणीवर संयम ठेवणे, ही सुद्धा तपस्या आहे...

- ब्र. कु. भगवानभाई, शांतिवन, (आबू रोड)

आपसातील संबंध जोडणे किंवा तोडणे यात मुख्य भूमिका आपल्या वाणीची असते. वाणी मनुष्याला कोठून कुठपर्यंत पोहचवते, हे आपण सर्व जाणतोच. द्रौपदीच्या तोंडातून दुर्योधनाविषयी निघालेले केवळ चार शब्द 'अंधे की औलाद अंधी' यामुळे सारे महाभारत घडले. मंथराने आपल्या शब्दांनी माता कैकेयीचे कान भरले. त्यातूनच रामायण घडले. तात्पर्य म्हणजे अगदी मोजक्या चुकीच्या शब्दांनी सुद्धा रामायण किंवा महाभारत घडू शकते. त्यामुळेच आपल्या वाणीवर संयम ठेवणे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. वर्तमान समयी देखील आपण पाहतो की चुकीच्या बोलण्यातून अनेक खून, मारामाऱ्या, अपघात, अनेक प्रकारच्या शारीरिक व्याधी होताना दिसत आहेत. इतकेच नव्हे तर अपशब्दांचा प्रयोग केल्याने आपसातील संबंधात कटुता निर्माण होत आहे. त्यातूनच परिवारात तसेच समाजात दुरावा वाढत चालला आहे. म्हणूनच म्हटले जाते, 'प्रथम तोला नंतर बोला.' असे बोल कधीच बोलू नका, जेणेकरून दुसऱ्याचे हृदय दुखावेल. आपले बोल सदैव सुखदायी, आनंददायी व वरदानी असले पाहिजेत. अशाप्रकारे आपल्या वाणीला संयमित ठेवणे, ही सुद्धा साधना वा तपस्या आहे.

## जसे विचार तशी वाणी

आपण दैनंदिन जीवनात जे पाहतो, ऐकतो, वाचतो त्यानुसार मनामध्ये विचार चालतात व जसे विचार तशी वाणी आपल्या मुखातून निघते. तसाच व्यवहार वा आचरण घडते. म्हणूनच आपल्या वाणीला श्रेष्ठ वा सकारात्मक बनविण्यासाठी सकारात्मक गोष्टीच बघा, ऐका आणि वाचा. त्यासाठी आपल्या दिनचर्ये ची सुरुवात शिव परमात्म्याच्या श्रीमतानुसार करा. अमृतवेळेला उठताच सर्वप्रथम शिवबाबांच्या स्मरणाद्वारे दिवसाची सुरुवात करावी. अशा प्रकारे योगाभ्यासाने आत्म्याला भरपूर बनविल्यानंतर, ज्ञान मुरलीतील ईश्वरी महावाक्यांद्वारे मनाला साऱ्या दिवसाकरिता सकारात्मक विचारांची दिशा द्यावी. फलस्वरूप दिवसभरात आपल्या मुखातून ज्ञान रत्नाचे हिरे-मोतीच बाहेर पडतील. **वर्तमान संगमयुगात जो ज्ञान रत्नांची देवाण-घेवाण करतो तोच भविष्यात महान बनू शकतो. म्हणूनच आपल्या मुखातून कधीही व्यर्थ बोल, परनिंदा, परचिंतन करणारे बोल व साधारण बोल कधीही निघता कामा नयेत. आपल्या मुखातून सदैव ज्ञान रत्न बाहेर पडले पाहिजेत तेव्हाच आपण परमात्म्याची मुले आहोत; हे प्रत्यक्ष होईल व आपल्याद्वारे परमात्म्याची प्रत्यक्षता होईल.**

## वाणीच्या संयमाचे महत्त्व

आपल्या स्वतःच्या बोलण्यावर संयम ठेवणे, ही सुद्धा तपस्या आहे. वाणीचे मौन ठेवल्यामुळेच आपले मन अंतर्मुखी बनून, स्वतःच्या आत्मस्वरूपाचा अनुभव करू शकते. तसेच स्वतःचे निरीक्षण व मूल्यांकन आपण करू शकतो. वाणीवर संयम ठेवल्यामुळे आपल्या हातून होणाऱ्या चुकांचे निरीक्षण आपण करू शकतो आणि त्यात सुधारणाही करू शकतो. त्यामुळे वाणीवर संयम ठेवणे ही काळाची गरज आहे.

वाणीवर संयम ठेवल्याने आपली स्वउन्नती होत जाते. तसेच बिघडलेली सर्व कामे सुद्धा ठीक होऊ लागतात. कारण प्रत्येक व्यक्ती ही मधुर बोल ऐकण्यासाठी इच्छुक असते. म्हणूनच म्हटलं जाते की गूळ देऊ शकत नसाल तर निदान गुळासारखे गोड तरी बोला.

## मधुर वाणीमुळे आशीर्वाद मिळतात

मधुर वाणीमुळे आपल्या जीभेवर



**प्रत्येक व्यक्तीला असे वाटते की आपण दुसऱ्याकडून उत्साहवर्धक, उन्नतीप्रद, स्वमान देणारे बोल ऐकावेत.**

जणू सरस्वतीचा वास आहे, असा अनुभव येतो. आपल्या मुखातून जे अमृतवचन, ईश्वरी महावाक्य निघतात ते सुखदायी व जीवनोपयोगी सिद्ध होतात. तसेच आपल्या संबंध-संपर्कातील माणसांना तणावातून मुक्त करतात. मधुर वाणीमुळे आपले स्वतःचे तसेच दुसऱ्याचे मनोबल वाढते. आपण स्वमानामध्ये टिकू शकतो व समोरच्या व्यक्तीमध्ये स्वमानाची जागृती होते. त्यामुळे सदैव मधुर बोला, कमी बोला व हळू बोला. कोणाला दुःख होईल, असे बोल आपल्या मुखातून कधीही येता कामा नयेत. **ज्ञान मुरलीतून शिवबाबा नेहमी सांगतात, ''तुम रूप-बसन्त हो, तुम्हारे मुखसे सदैव रत्न निकलने चाहिए। यदि तुम्हारे मुख से पत्थर निकलते है, तो तुम ईश्वरीय सन्तान कहलाने के अधिकारी नही हो। जब तुम्हारे संकल्प और बोल शुभ होंगे, तो कर्मभी अवश्य शुभ होंगे।''** त्यामुळे असे बोल बोला की ते ऐकण्यासाठी लोक चातक असतील. याला म्हणतात - 'अनमोल महावाक्य'. महावाक्य मोजकीच असतात परंतु ती दुसऱ्यांसाठी लाभदायक व मधासारखी गोड असतात. ऐकणाऱ्याच्या हृदयाला जाऊन भिडतात. म्हणूनच संत कबीर म्हणतात-

**ऐसी वाणी बोलिये,**<br>**मन का आपा खोये।**<br>**औरन को शीतल करे,**<br>**आपहुं शीतल होए।।**

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मधुर बोल बोलण्याने आपल्याला दुसऱ्यांकडून आशीर्वाद प्राप्त होतात; ज्यामुळे आपली आत्मोन्नती झपाट्याने होत जाते.

### जशी वाणी तशाच भावना प्रकट होतात

ज्याप्रमाणे कोकिळा व कावळा यांची ओळख त्यांच्या वाणीतून होते. त्याचप्रमाणे मनुष्याची मनःस्थिती, दृष्टिकोन, भावना, व्यवहार व जीवनशैली त्याच्या वाणीतून प्रकट होते. वाणीद्वारे आपल्या मनात दुसऱ्याविषयी कशा प्रकारच्या भावना आहेत. हे दिसून येते. प्रत्येक व्यक्तीला असे वाटते की आपण दुसऱ्याकडून उत्साहवर्धक, उन्नतीप्रद, स्वमान देणारे बोल ऐकावेत. परंतु याच्या विपरीत अपमानास्पद बोल जेव्हा ऐकायला मिळतात तेव्हा मात्र मनाला ठेच पोचते. त्यामुळे सदैव लक्षात ठेवा की परमात्मा शिव पित्याने आपल्याला वाणीचा उपयोग वरदानी रूपात करायला सांगितले आहे. म्हणूनच वाणीचा कधीही जरासुद्धा दुरुपयोग करू नका. वाणीद्वारे दुसऱ्यांना आघात पोचवू नका. बोलता येत नसेल तर गप्प बसा परंतु चुकूनही व्यर्थ बोल किंवा दुसऱ्याला डिस्टर्ब करणारे बोल बोलू नका. आपल्या ओठांच्या धनुष्यबाणातून इतरांना दुःख देण्यासाठी शब्दरूपी बाण सोडू नका. फलस्वरूप संबंधातील माधुर्य कायम टिकून राहील.

### मधुर वाणीमुळेच जीवनात सदा सफलता

मधुर वाणीमुळेच आपण जीवनात सफलता प्राप्त करू शकतो. त्यामुळे वाक् चातुर्य शिकणे गरजेचे आहे. कोणत्या परिस्थितीमध्ये कोणाशी कसे बोलायचे, ही कला आत्मसात करणे आवश्यक आहे. जितके आपण सारयुक्त बोलू, कमी बोलू, युक्तियुक्त बोलू योगयुक्त बोलू तितकी वाणी शक्तिशाली बनत जाईल. त्यामुळे वाणीची शक्ती जमा करा. त्याचे साधन आहे- कमी बोला, मधुर बोला व स्वमानात राहून बोला. कधीही व्यर्थ व दुसऱ्याची मजाक करणारे बोल बोलू नका.

### वरदानी स्थितीत राहता, बोलही होती वरदानी

आपल्या जीवनातील अर्ध्याहून अधिक समस्या ह्या तर आपल्याच चुकीच्या बोलण्यामुळे निर्माण होत असतात. **यातून सहज मुक्त होण्यासाठी केवळ एक शब्द लक्षात ठेवा- 'वरदानी'. ब्राह्मण जीवन हे खऱ्या अर्थी वरदानी जीवन आहे. त्यामुळे आपला प्रत्येक संकल्प व बोल वरदानी असला पाहिजे. कारण आपण महान आत्मे पूर्वज, पूज्य आहोत व इष्ट देवीदेवता आहोत.** ही सर्वश्रेष्ठ स्मृती आपण सदैव जागृत ठेवली पाहिजे. याद्वारेच आपले प्रत्येक वाक्य हे अनमोल महावाक्य बनेल व आपल्याद्वारे परमात्म प्रत्यक्षतेचे कार्य संपन्न होत जाईल. याअनुषंगाने पुढील गीताच्या ओळी सदैव लक्षात ठेवा -

**मधुर वचन जो सबको सुनाये**<br>**सुख-शान्ति वो जन बरसाये।**<br>**ज्ञान का रस अब घोल,**<br>**मीठी वाणी बोल रे मनवा,**<br>**मीठी वाणी बोल।**

■■

# परमात्म्याचा **शोध** आणि **बोध**

- ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे



शतकानुशतके तपस्वी आत्मे, शोध घेत आहेत परमात्म्याचा
रानावनातील पर्वत पार करूनही, शोध नाही लागला त्याचा ।।१।।
ऋषी मुनीही वदले, 'अंत कसा लागेल बेअंत परमात्म्याचा?'
अंत लागला नाही म्हणूनी, एक सिद्धांत ठोकिला सर्वव्यापीचा ।।२।।
भक्तिमार्गातील तपस्येने प्राप्ती होते क्षणिक साक्षात्काराची
पाहूनी तो साक्षात्कार, साधका वाटते प्राप्ती जाहली परमात्म्याची ।।३।।
परमात्म प्राप्ती व त्याच्या शोधाची पूर्ती होते, केवळ संगमयुगावरी
धर्मग्लानी समयी स्वयं परमात्माच, अवतरित होतो भूवरी ।।४।।

आपुला सत्य परिचय देण्याअर्थ, निराकार साकार होतो
सत्ययुग व सत्यधर्माच्या स्थापनार्थ तो ब्रह्मातनात येतो ।।५।।
अवतरण भूमीवरी, आनंद लुटावा साकार प्रभु मीलनाचा
साकार मीलन सन्मुख होवूनी, शोध संपतो परमात्म्याचा ।।६।।
आता परमात्माच शोधित आहे, आपुल्या सहयोगी आत्म्यांना
त्याला शोधावयाचे आहे, पूर्वाश्रमीच्या सर्व देवात्म्यांना ।।७।।
विदेही परमात्मा आधार घेत नाही, कोणा महंताच्या देहाचा
म्हणूनी कोणी विरळाच भेद जाणितो, त्याच्या अवतरणाचा ।।८।।

साधारण वृद्ध तनात मी प्रवेश करतो, महावाक्य हे गीतेचे
ह्याची महावाक्याद्वारे, रहस्य जाणावे परमात्म अवतरणाचे ।।९।।
कच्छ, मच्छ, वराह अवतार मानणे, हा अंधःकार अज्ञानाचा
अंधःकारासी ह्या दूर करण्या, दीप प्रज्वलित करा सत्यज्ञानाचा ।।१०।।
मज परमात्म्याच्या स्वरूपाला जो जाणीत नाही, तो असे मूढ
श्रीमद्भगवद्गीतेतील टीका ही, भगवंताची किती आहे गूढ ।।११।।
पुजाऱ्यांनाही पूज्य बनविणे, महान कार्य हे परमात्म सत्संगाचे
समस्त सत्संग एक समान मानणे, द्योतक हे अज्ञानाचे ।।१२।।

सर्व धर्मातील सर्व आत्म्यांनो, जाणा आपुल्या परमपित्याला
एकवीस जन्मांचा वारसा हक्क, देण्या आला आहे आत्मा आत्म्याला ।।१३।।
हे साधका, संगमयुगाविना परमात्म मीलन संभव नसते
कल्पातील ही अति दुर्लभ संधी, प्रत्येक आत्म्यासाठी असते ।।१४।।
शिव अवतरणाचा हा दिव्य संदेश, सकल जनासी प्राप्त होतो
साधक तोची खरा, तो स्वकल्याणासह विश्वकल्याणही साधतो ।।१५।।
सत्ययुगाच्या स्थापनेपूर्वी, महाविनाशाची सावली आहे जगतावरी
त्यागूनी निद्रा अज्ञानाची, चिंतन करावे परमात्म ज्ञानावरी ।।१६।।

परमात्म प्रत्यक्षता पाहूनी, घोर पीडा होईल अंतःकरणी
निराशा व पश्चात्तापाचे अश्रू येतील, भक्त जनांच्या लोचनी ।।१७।।
परमधामी जाताना, काय येणार आहे आपुल्या बरोबरी
बरोबरी येते ती केवळ, आपुल्याच कर्मफलांची शिदोरी ।।१८।।
ह्या लहान काव्यातूनी, जगत कल्याणाचा महान बोध घ्यावा
युग परिवर्तनाच्या पुण्यकार्यात, परमात्म्याला सहयोग द्यावा ।।१९।।
बंधुंनो, 'सोने की चिडियाँ' म्हणूनी भारताचे पुनःगायन होईल
श्री लक्ष्मीनारायणाचे चारित्र्य संपन्न राज्य अल्पावधीतच येईल ।।२०।।

# विजयादशमी

- ब्र.कु. दत्तात्रयभाई डहाळे, नांदेड

विजयादशमी महोत्सव हा संपूर्ण भारत वर्षात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीमध्ये विजयी रथोत्सवात बसून रामाच्या हस्ते दशानन (दशविकारी) रावणाचा पुतळा जाळला जातो. परंतु केवळ रावणाचा पुतळा जाळून मनातील विकार जळत नाहीत. ते नष्ट करण्यासाठी खऱ्या रावणाचा नाश करणे आवश्यक आहे. आज आपण पाहतो की, समाजात अनेक रावण वृत्तीचे तांडव चालू आहे. दिवसेंदिवस सामाजिक स्थिती अस्थिर होत चालली आहे. जिथे आजही स्त्रिया असुरक्षित आहेत. निर्भयासारखे अनेक कांड चालूच आहेत ना! माणसा–माणसात द्वेष–मत्सर फोफावत चाललेला आहे. प्रतिष्ठेचा सर्वत्र मोठा बाजार भरलेला असून, अहंकाराने त्याला विळखा घातलेला आहे. मनुष्यातील या सर्व आसुरी प्रवृत्तींचा नाश होणे म्हणजे खऱ्या रावणाचा अंत झाला, असे म्हणता येईल.

### रावण मायेच्या पाच विकारांचे प्रतीक

साधारणत: पुतळा हा जिवंत माणसाचा जाळला जातो. कित्येक राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आपल्या विरोधकांचे पुतळे जाळतांना आपण पाहतो. मेलेल्या पुढाऱ्यांचे पुतळे कधी जालले जात नाहीत, आपण दरवर्षी रावणाचा पुतळा जाळतो, यावरून हे सिद्ध होते की रावण आजही जिवंत आहे. रावण हा आपणा सर्वांचा जुना शत्रू आहे, ज्याच्यामुळे आपले महाभयंकर नुकसान होत आहे. परिणामत: आज संपूर्ण सृष्टी दु:खधाम




वा नरक बनली आहे.

**रावणाचा अर्थ आहे रडविणारा, रावणाची दहा तोंडे ही सुद्धा एक अलंकारिक भाषा आहे. रावण मायेच्या पाच विकारांचे प्रतीक आहे. पुरुषातील पाच विकार (काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार) आणि स्त्री मधील पाच विकार यांच्या संयुक्त रूपाचे प्रतीक म्हणून रावणाची दहा तोंडे दर्शविण्यात आली आहेत,** द्वापरयुग व कलियुग या दोन युगात (अर्थात २५०० वर्षे) रावणाचे राज्य या सृष्टीवर असते कारण यावेळी मनुष्य देहअभिमानी बनल्याने, विकारी प्रवृत्ती मार्ग असतो. अशा या विकाररूपी रावणाला केवळ योग अग्नीने जाळता येते. योग अर्थात स्वत:ची आत्मज्योती जागृत करून, परमज्योती शिव पित्याची प्रेमपूर्वक आठवण करणे. त्यामुळे दसरा (दशहरा) याचा खरा अर्थ आहे, पति–पत्नी, उभयतांनी आपल्यातील दाही विकारांना योगाग्निने भस्म करणे. वास्तविक हीच ती परमपावन मंगल वेळ आहे; जेव्हा स्वयं परमात्मा शिवपिता, या सृष्टीवर अवतरित होऊन, आपल्याला राजयोग शिकवित आहेत. या राजयोगाच्या अभ्यासानेच आपण विकाररूपी रावणावर विजय प्राप्त करून, खऱ्या अर्थी विजयादशमी साजरी करू शकतो. कारण रावणाचा नाश होताच जीवनात अविनाशी सुख शांतीची नित्य दिवाळी अनुभवाला येते. आपले जीवन दिव्यतासंपन्न बनते.

### विजयादशमीच्यापूर्वी नवरात्री का?

द्वापरयुगापासून आत्मारूपी सीता कांचनमृगाच्या मोहात पडून राम परमात्म्याशी विन्मुख झाली. त्यानंतर कलियुगाच्या अंतापर्यंत सारी सृष्टी जेव्हा शोक वाटिका होते तेव्हा निराकार राम (अर्थात शिव परमात्मा) ज्ञान व योगाच्या अमोघ शस्त्रांनी पाच विकाररूपी रावणावर विजय मिळवून देण्याचे शिक्षण देतो आणि पावन, सतोप्रधान, दैवी स्वराज्याची पुनर्स्थापना करतो. अर्धा कल्प (२५०० वर्षे) अजिंक्य असलेल्या रावणावर विजय मिळविण्यासाठी आता **संगमयुगात शिवपरमात्मा माता व कन्यांना निमित्त बनवतो. अर्थात त्यांच्या शिरी ज्ञानकलश ठेवतो. याच आदि शक्तीद्वारे अर्थात ब्रह्माकुमारी भगिनींच्याद्वारे ईश्वरी ज्ञानाचा प्रसार होऊन, विश्वातील असुरी शक्तींचा अर्थात विकाररूपी रावणाचा नाश होतो. याचेच प्रतीक म्हणून विजयादशमीच्या पूर्वी नवरात्री साजरी केली जाते. तसेच नवरात्रीच्या दिवसात**

**श्रीलक्ष्मी, श्रीसरस्वती, श्री जगदंबा, श्रीकाली, श्री दुर्गा इत्यादी रूपांनी देवींची पूजा केली जाते.** वास्तविक देवींची पूजा अर्थात स्त्री शक्तीची पूजा होय. यावरून आपल्या लक्षात आले असेल की, वर्तमान संगमयुगाचा काळ हाच खऱ्या अर्थी नवरात्रीचा काळ आहे. ज्यावेळी आपण सर्वांनी राजयोगाच्या अभ्यासाने विकारांवर विजय प्राप्त केला पाहिजे. आज विश्वभरातील लाखो ब्रह्मावत्स त्यासाठी तीव्र पुरुषार्थ करीत आहेत. त्यामुळे आपणही संगमाचे महत्व लक्षात घेऊन, स्वत:ला संपूर्ण निर्विकारी, पावन देवीदेवतातुल्य बनवा त्यासाठी विजयादशमीच्या मुहूर्तावर शिव परमात्माच्या शिवशक्ती सेनेत सामिल होऊन पाच विकाररूपी रावणाचा नाश करण्याची दृढ प्रतिज्ञा करा. आजवर अज्ञानवश केवळ रावणाचा पुतळा जाळला. परंतु आता खऱ्या रावणाला योगाग्निने जाळा.

**विकाररूपी रावणाची उत्पत्ती कधी व कशातून होते?**

रावणाची उत्पत्ती कधी व कशी होते, हे जाणण्यासाठी आपल्याला संक्षिप्तपणे सृष्टिचक्राचे ज्ञान जाणणे आवश्यक आहे. सृष्टिचक्र हे पाच हजार वर्षाचे असून, त्यात सत्य, त्रेता, द्वापर व कलियुग यांचा समावेश आहे. प्रत्येक युग हे १२५० वर्षाचे आहे. सत्ययुग व त्रेतायुगालाच स्वर्ग असे म्हटले जाते. तेथे देवीदेवतांचे राज्य असते. त्यावेळी देवीदेवता या आत्मअभिमानी असल्याने, त्यांच्यात कुठल्याही विकाराचा अंश नसतो. त्यामुळे त्यांच्या हातून कुठलेही विकर्म होत नाही. फलस्वरूप स्वर्गात सदा सुख-शांती-समृद्धी असते.

परंतु द्वापरयुगाला जेव्हा प्रारंभ होतो तेव्हा देवीदेवतांमध्ये देहअभिमान जागृत होतो. या देहअभिमानातूनच पाच विकारांची अर्थात रावणाची उत्पत्ती होते. या विकारांच्या वशीभूत होऊन, मनुष्य जे कर्म करतो ते विकर्म वा पापकर्म बनते. यामुळेच त्याला दु:ख भोगावे लागते. कलियुगात विकारांची तीव्रता अधिकच वाढत गेल्याने, मनुष्य अतिशय दु:खी बनतो व ही सृष्टी दु:खधाम बनते. **अशावेळी दु:खहर्ता, सुखकर्ता, पतितपावन, शिव राम (परमात्मा) सृष्टीवर अवतरित होतो आणि मनुष्याला विषय–विकारापासून अर्थात रावणापासून मुक्त करण्यासाठी राजयोग शिकवितो. त्यामुळे रावणाची उत्पत्ती करणारा जो देहअभिमान त्याचा त्याग करणे म्हणजेच खऱ्या अर्थी रावणाला मारणे, दसरा, विजयादशमी साजरे करणे होय.** तसेच या देहाला चालविणारा मी चैतन्य आत्मा आहे. ही स्मृती ठेवा, अशाप्रकारे सदैव आत्मज्योति जागृत ठेवणे, हीच खरी दिवाळी होय. म्हणूनच आधी दसरा नंतर दिवाळी साजरी केली जाते. वास्तविक प्रत्येक सण वा उत्सव हा आपल्या महानतेची, श्रेष्ठतम स्वधर्माची स्मृती देण्यासाठी असतो. 'हम सो देवता, देवता सो हम' (हम सो सो हम्) या परम सत्याची जागृती करविण्यासाठी असतो. परंतु अज्ञान निद्रेत झोपलेल्या कुंभकर्णासारखी आजच्या मनुष्याची स्थिती आहे. त्यामुळे त्याला पुन्हा जागृत करणे, हे आपले कर्तव्य आहे. सारांशाने असे म्हणता येईल–

**जाग मानवा जाग, शिव राम आलासे दारी।**
**योगाग्निने रावणाचे दहन कर तू लवकरी।।**

■■


VIDEOCON d2h DIRECT HAI CORRECT HAI # 497 | airtel digital TV # 686 | RELIANCE BIG TV # 171 | TATA Sky # 192

Peace of Mind CHANNEL

ब्रह्माकुमारी संस्थेचे ''पीस ऑफ माईन्ड'' चॅनेल (D2H) डी टू एच उपग्रह वाहिनीवर उपलब्ध आहे. याचा अवश्य लाभ घ्यावा व आपल्या जीवनात स्थायी मनाची शांती अनुभव करा.

SITY NETWORK
MUMBAI - 557

HATWAY
MUMBAI - 838

IN CABLE
MUMBAI - 501

BHIMA RIDDHI
SOLAPUR - 505
KOLAHAPUR - 497

मोबाईलवर थेट प्रक्षेपण

Live on Mobile

Vodafone 552013 | Reliance 56300123 | Airtel 55231

# संगमयुगी ब्राह्मण जीवनाची अंतिम स्थिती-कर्मातीत

- ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे

भाग -२

(खास ब्रह्मावत्सांकरिता)




कर्मातीत स्थितीच्या समीप जाणाऱ्या आत्म्याचे मुख्य लक्षण हेच असते की, केवळ कर्म करण्यासाठी तो कर्मेंद्रियांचा आधार घेतो व कर्म समाप्त होताच कर्मेंद्रियांच्यापासून अलग होतो. ज्याप्रमाणे तो कर्मेंद्रियांचा उपयोग करतो त्याचप्रमाणे तो अन्य साधनांचाही उपयोग अवश्य करेल परंतु त्या साधनांना तो आपला आधार बनविणार नाही. **कर्मातीत स्थिती म्हणजे कर्मापासून व जनसंपर्कापासून अलग होणे नव्हे. अर्थात साधक चांगल्या वाईट आत्म्यांच्या संपर्कात येऊनही आपली स्थिती सदा कमलफुल समान न्यारी व प्यारी ठेवतो.** वाचा सेवेद्वारा अनेकांना परमात्म अवतरणाचा संदेश व परमात्म ज्ञान दिल्यानंतर त्या सेवेची व संपर्कात येणाऱ्या भिन्न-भिन्न आत्म्यांची त्याला सहज विस्मृति होते. असा सेवाधारी आत्मा भविष्यातील सेवेची योजना व त्यासंबंधीचा विचार अवश्य करेल. परंतु भूतकाळात केलेल्या सफल अथवा असफल सेवेचा अकारण विचार करणार नाही. कर्मातीत स्थितीजवळ जाणारा आत्मा कोणत्याही कर्माच्या विनाशी फळाची अपेक्षा ठेवत नाही. त्याच्या प्रत्येक श्रेष्ठ कर्माचे सुखदायी व श्रेष्ठ प्रारब्धात रूपांतर होत असते. त्याची कर्मातीत स्थिती जितकी समीप येईल तितकी त्याला शांतस्वरूप, धीरगंभीर व आनंदस्वरूप स्थिती प्राप्त होऊन तो निरंतर अतिंद्रिय सुखाचा अनुभव घेत राहिल. अविनाशी रुद्र ज्ञान यज्ञाचा हा नियम आहे की, साधक सोळा कला संपन्न अथवा संपूर्ण कर्मातीत झाला तर तो आपल्या पतित देहाचा सहज त्याग करून सूक्ष्म वतनवासी बनतो. सूक्ष्म वतनवासी झाल्यावरही तो आपल्या सूक्ष्म शरीराद्वारे साकार वतनात येऊन बेहदच्या व विहंग मार्गाच्या सेवेचा आरंभ करतो. जी सेवा व ब्रह्मावत्सांची पालना गेली ४६ वर्षे अव्यक्त ब्रह्माबाबा करीत आहेत. म्हणून एका गीताचे बोल आजही वारंवार कानी पडतात. ते बोल आहेत 'आज भी देते वो बाबा पालना साकारकी' अंतिम समयी जे साधक फरिश्ता रूप धारण करतील त्यांचे फरिश्ता रूपातील व इष्टदेवरूपातील साक्षात्कार भक्तजनांना होतील. हीच ती परमात्म्याने केलेली श्रेष्ठ आत्म्यांची प्रत्यक्षता असेल. **अंतिम समयी अनेक समस्या उग्ररूप धारण करतील परंतु आपल्या संपन्न व महान स्थितीद्वारे साधक प्रत्येक समस्येला लहान बनवेल. अर्थात कोणत्याही समस्येत तो परेशान न होता आपल्या शानमध्ये राहून त्या समस्येला सहज पार करेल.** ह्या अंतिम समयी मास्टर सुखकर्ता दुःखहर्ता बनून आपल्या आत्मिक दृष्टिद्वारे अन्य दुःखी व अशांत आत्म्यांना सुखशांतीचा अनुभव करवून देण्याचा त्याचा पार्ट असेल. हा पार्ट बजाविताना मात्र तो दुःखी आत्म्यांना पाहून दुःखी होणार नाही. तसेच कुणाच्याही कर्मबंधनात अथवा मायेच्या बंधनात बद्ध होणार नाही. त्याचा साक्षीभावही उच्चप्रतीचा असेल.

कर्मातीत ह्या महान स्थितीचा महान पुरुषार्थ करणारा महान साधक सदा निश्चिंत असतो. **त्याच्या निश्चिंत मनात हीच संकल्पना असते की, 'जो हुआ वो अच्छा हुआ, जो हो रहा है वह अच्छा है और जो होनेवाला है वह बहुत अच्छा है। क्योंकि, ड्रामा कल्याणकारी और अच्छा है।' अशा प्रकारे तिन्ही काळाविषयी व ड्राम्याविषयी सदा निश्चिंत राहणारा आत्मा निश्चितपणे बंधनमुक्त होतो.** ह्याशिवाय त्याचा हा देखील संकल्प असतो की, ह्या कल्याणकारी संगमयुगावर कल्याणकारी शिवबाबांचा मी आत्मा कल्याणकारी पुत्र आहे.

**कर्मसंबंध व कर्मबंधनाच्या गुह्य गतीला साधक जाणत असल्याने कर्मबंधन समाप्त होण्यासाठी तो त्याच्या बुद्धिमत्तेचा व कर्म-कौशल्याचा उपयोग करतो.**



फलस्वरूप ह्या युगावरील प्रत्येक क्षण माझ्यासाठी कल्याणकारी आहे. सदा स्वकल्याण व विश्वकल्याणाचे चिंतन करणारे आत्मेच शिवबाबांच्या स्मृतीत मग्न होऊन, निर्विघ्न स्थितीचा अनुभव करतात व अन्य आत्म्यांसाठीही विघ्नहर्ता बनतात. अनेक आत्म्यांसाठी विघ्नहर्ता बनल्याचा अनुभव मा. सूरजभाई आपल्या ओजस्वी प्रवचनात सांगत असतात. अशा साधकाने अनेक विघ्नांना व परिस्थितींना पार केले असल्याने त्याचेजवळ अनुभवाची ऑथॉरिटी असते. जी ऑथॉरिटी त्याला बाप समान कर्मातीत बनण्यासाठी मदत करते. अशाप्रकारे पुरुषार्थाची एक-एक पायरी अत्यंत उमंग उत्साहाने चढून प्रतिदिनी शुद्ध सात्विक असा नवा आनंद प्राप्त करताना स्वतःविषयी सदा शुभचिंतन करणाऱ्या आनंद स्वरूप साधकाच्या मनात कधीच नैराश्याचा अंधःकार येत नाही. कर्मसंबंध व कर्मबंधनाच्या गुह्य गतीला साधक जाणत असल्याने कर्मबंधन समाप्त होण्यासाठी तो त्याच्या बुद्धिमत्तेचा व कर्म-कौशल्याचा उपयोग करतो. कर्मबंधन आहे चक्रव्यूहाची स्थिति. ह्या चक्रव्यूहातून कसे पार व्हायचे हे ज्याचे त्यालाच ठरवायचे आहे कारण प्रत्येक आत्म्याची आजूबाजूची परिस्थिती, वातावरण, भूतकाळ व वर्तमान काळातही कर्मबंधनात येणारे आत्मे; त्यांचे स्वभाव, संस्कार हे सर्व भिन्न असल्याने कर्मबंधनमुक्तीसाठी करावे लागणारे संकल्प व कर्मही भिन्न भिन्न प्रकारचे असते. **बंधूंनो, चक्रव्यूहात अटकणारा आत्माच चक्रव्यूहातून सुटण्याचा मार्ग निश्चित करीत असतो. ज्यांना हा मार्ग निश्चित करता येत नाही ते वारंवार अन्य आत्म्यांचा सल्ला घेत राहतात. जो साधक स्वयं निर्णयी बनतो त्याचे प्रत्येक कर्म अचूक, अलौकिक व समस्त विश्वाला प्रभावित करणारे असते. अर्थात, असा आत्मा आपले कर्मातीत बनण्याचे लक्ष्य योग्य कालावधीत साध्य करतो.**

ज्ञान प्राप्तीनंतर बेहदचे वैराग्य प्राप्त होऊन त्या वैराग्यानुसार जो साधक मायेचा, मायावी देहाचा, मायावी संबंधांचा व मायावी दुनियेचा संन्यास अर्थात बेहदचा संन्यास करतो, तो साधक भविष्यात आपल्या निरंतर पुरुषार्थाद्वारे कर्मातीत स्थिती सहज प्राप्त करू शकतो. जसे हदचा संन्यास घेतल्याने हदच्या देहधाऱ्यापासून आत्मा बंधनमुक्त होतो त्याचप्रमाणे बेहदचा संन्यास घेतल्याने बेहदच्या दुनियेपासून आत्मा बंधनमुक्त होऊन संगमयुगी जीवनमुक्तीच्या परमानंदाचा अनुभव प्राप्त करू शकतो. बंधूंनो, स्पष्ट दिसणाऱ्या बंधनाच्या शृंखला तोडणे फार कठीण नसते. परंतु अतिसूक्ष्म बंधनाच्या शृंखला महीन बुद्धीशिवाय जाणता येत नाहीत व तोडताही येत नाहीत. म्हणून आपल्या मनबुद्धीला महीन बनविणे तर आवश्यक आहेच त्याशिवाय मनाचे चेकिंग करावे की, विदेही परमात्म्याला समर्पण केलेल्या ह्या मनात कोणकोणत्या देहधाऱ्यांची बंधनयुक्त स्मृती राहिलेली आहे? ह्याशिवाय वस्तू, वैभव व धनसंपत्तीचा अकारण विचार केल्यास त्याचेही बंधन आत्म्यावर येते. अलौकिक क्षेत्रात सेवा करीत असतानाही अमुक एक आत्माच सेवेसाठी साथीला पाहिजे हे देखील अलौकिक बंधन आहे. सेवाधारीच्या इच्छेप्रमाणे त्याला साथीदार दिला व तो साथीदार सेवेसाठी इच्छित स्थळी पोहचू शकला नाही तर त्याची अनेक वेळा स्मृती येऊन मनाची अस्वस्थता होते. अशी अस्वस्थता होणे म्हणजेच बंधनात अटकणे होय! ह्या अलौकिक बंधनालाच 'सोने की जंजीर' म्हटले जाते. म्हणून सेवा क्षेत्रात जी सेवा प्राप्त होईल, जी सेवेची साधने उपलब्ध असतील, जे सहयोगी सहयोग देण्यासाठी येतील अशा सर्वांना सामावून घेऊनच सेवा करावी. कोणत्याही आत्म्याविषयी लगाव वा झुकाव असेल तर त्या झुकावामुळे हदचा सहारा निर्माण होऊन विदेही परमात्म्याऐवजी देहधारी आत्म्याचीच स्मृती मनात येत राहील. **त्यासाठी पक्की खूणगाठ बांधावी की, 'परमात्मा ही मेरा एक सहारा है'। हा सहारा अप्रत्यक्षपणे प्राप्त होण्यासाठी परमात्मा कोणालाही निमित्त बनवू शकतो. अर्थात, निमित्त बनविणाऱ्या परमात्म्याची मात्र सेवेतही विस्मृती होता कामा नये. सेवेतील साथीदाराप्रमाणेच भिन्न-भिन्न विनाशी साधनांना साधकाने आपला आधार बनवू नये.** साधनांची स्थिती कालानुरूप खराब होत असते. जर त्यांना आपला आधार मानाल तर त्या साधनांप्रमाणे आत्म्याची स्थितीही ठीक राहणार नाही. सेवेत एखाद्या ब्रह्माकुमारी भगिनीलाच सहारा मानाल तर असा सहारा साधकांसाठी सुवर्णमृग आहे, असे समजावे. रामायणात

अत्यंत मार्मिक उदाहरण आहे की, सुवर्णमृगात मोह गेल्याने सीतेला रामाच्या सहवासातून, रावणाच्या कारागृहात बंदिस्त व्हावे लागले. म्हणून ब्रह्मावत्सांनी सुवर्णमृगाची व त्याचबरोबर व्यर्थ आशेच्या मृगजळाची निर्मिती आपल्या आंतर्आत्म्यात करू नये. असे सुवर्णमृग व मृगजळ आपणा सर्वांसाठी मोहाचे बंधन आहे. हे बंधन सर्वश्रेष्ठ भाग्याला व संपूर्ण कर्मातीत स्थितीला वंचित करणारे आहे. म्हणून माझ्या आत्मिक बंधूंनो, ड्रामानुसार तुमच्याबरोबर सेवेसाठी जे साथीदार असतील, जी त्यावेळची परिस्थिती असेल त्यामध्ये स्वतःला ॲडजेस्ट कराल तर तुमच्यासाठी तुमचे श्रेष्ठ भाग्यही ॲडजेस्ट होऊन तुमच्या पदरात पडेल. सुवर्ण मृगाचा मोहच सुवर्णयुगापासून आत्म्याला वंचित करतो.

पाहिजे त्यावेळी अशरीरी बनून, फरिश्ता रूप प्राप्त करणे म्हणजे उरल्या-सुरल्या अंतिम सूक्ष्म बंधनांची शृंखला तोडणे होय! **सर्वस्व समर्पण करणाऱ्या साधकाला ही अंतिम शृंखला तोडावयाची असेल तर त्याने असे चिंतन करावे की, संपूर्ण समर्पणामुळे हे तन माझे राहिले नाही, धन माझे नाही व मनही माझे राहिले नाही तर बंधन ते कसले राहिले! तीव्र पुरुषार्थी त्यालाच म्हणावयाचे जो गतजन्मांची सर्व पापकर्मे, सर्व कर्मबंधने व सर्वप्रकारचे अकल्याणकारी हिसाब-किताब संगमयुगावर समाप्त करून निष्कलंक असे रजिस्टर बनवितो.** अर्थात या निष्कलंक रजिस्टरमुळे त्याचे जीवन हिरेतुल्य बनते. असे हिरेतुल्य जीवन प्राप्त करून जे आत्मे ब्रह्मा बापसमान कर्मातीत स्थिती प्राप्त करतील तेच आत्मे अंतिम समयी अन्य आत्म्यांचे बापसमान पालन करतील. त्या पालनेचा सुखद अनुभव करताना प्रत्येक आत्म्याच्या मनात हाच विचार येईल की, 'ह्या संपूर्ण पावन योगीतू आत्म्याद्वारेच केवळ मज आत्म्याचे नव्हे तर समस्त विश्वाचे कल्याण होईल.' हीच ती बापसमान कर्मातीत व संपूर्ण पावन स्थिती होय! अशी ही बापसमान स्थिती तेच ब्रह्मावत्स प्राप्त करू शकतील ज्यांचे संकल्प वैश्विक स्तरावर व बेहदचे असतील. हदचे संकल्प करणारे आत्मे ना विश्वकल्याणी बनू शकतील, ना बापसमान कर्मातीत स्थिती प्राप्त करू शकतील. आमची गीतापाठशाळा, आमचे सेंटर, त्या सेंटरच्या आसपासचा आमचा परिसर, आमचे जिज्ञासू, आमचे सहयोगी आत्मे ह्या हदच्या संकल्पना आत्म्याला हदमध्ये आणणाऱ्या व कर्मातीत स्थितीपासून दूर नेणाऱ्या आहेत. **म्हणून कर्मातीत स्थिती प्राप्त करण्यासाठी साधकाने एकच शब्द ध्यानात ठेवावा. तो शब्द आहे, बेहद! साधक बेहदच्या वृत्तीमध्ये राहून सेवा व कर्म करेल तर अंतसमयी कर्मातीत स्थिती प्राप्त होऊन त्याला दैवी स्वराज्यात उच्चपदही प्राप्त होईल. अर्थात हदमध्ये राहून जो पुरुषार्थ करेल त्याला सत्ययुगातही हदचे पद प्राप्त होईल.** बेहदच्या पुरुषार्थासाठी फरिश्ता आहे. विश्वकल्याणी फरिश्त्याला कोणतीही हद नसल्याने त्याची परिक्रमा संपूर्ण विश्वासाठी असते. तो असा संकुचित विचार कदापि करणार नाही की, मी केवळ माझ्या सेंटरच्या परिसरातच योगाची प्रकंपने देत राहीन. बेहदचा फरिश्ता अर्थात त्याची कोणतीही हद अथवा त्याचा कुणाशीही हदचा रिश्ता नसतो. ज्याला बेहदचा फरिश्ता बनवायचे आहे त्याने पुरुषार्थ आणि प्राप्ती तसेच स्मृती आणि समर्थी, ह्या प्रत्येक दोन-दोन शब्दांना एकच शब्द जोडावा. तो शब्द म्हणजे बेहद! मधुबनहून ज्यावेळी सेवाअर्थ महारथी आत्मे येतात त्यावेळी ते आपल्या प्रवचनाद्वारे व योगयुक्त स्थितीद्वारे आपली पालना करतात. त्यांच्या प्रवचनात शक्यतो हदची भाषा नसते. अर्थात ते सदा वैश्विक स्तरावर बोलत असतात. त्यांच्यापासून निघणारी प्रकंपनेही बेहदची असतात. **मधुबन निवासी आत्म्यांचा आदर्श ठेवून कोणत्याही हदच्या वातावरणाला आपल्या बेहदच्या वृत्तींद्वारे परिवर्तन करण्याचा पुरुषार्थ करावा. जर तुमच्यासमोर कोणी हदची भाषा करीत असेल तर तुम्ही त्याला बेहदचे स्वरूप देऊन बेहदमध्ये घेऊन जा. असे बेहदमध्ये घेऊन जाणे हे विश्वसेवाधारी व विश्वकल्याणी आत्म्याचे लक्षण आहे. हद शब्दात अनेकतेचा भाव आहे तर बेहद शब्दात एकतेचा भाव आहे.** संगमयुगावर आपला ब्राह्मण परिवार एक आहे तसेच सत्ययुग व त्रेतायुगातही आपला दैवी परिवार एकच असेल. तेथे कोणताही आपपरभाव नसेल. 'आपण सारे एकाच विश्वाचे धनी आहोत', ही



**विश्वकल्याणी फरिश्त्याला कोणतीही हद नसल्याने त्याची परिक्रमा संपूर्ण विश्वासाठी असते. तो असा संकुचित विचार कदापि करणार नाही की, मी केवळ माझ्या सेंटरच्या परिसरातच योगाची प्रकंपने देत राहीन.**

**लौकिक अभ्यासासाठी विद्यार्थ्याने ध्यास घेतला तर त्याला कोणी असे म्हणत नाही की, 'ह्याला अभ्यासाचे वेड लागले आहे!'**



बेहदची भावना व बेहदचे संस्कार तेथे असतील. तेच संस्कार आपल्याला संगमयुगावर धारण करावयाचे आहेत. म्हणून मनात असलेल्या हदच्या लिस्टवर काट मारून त्यावर बेहद हा एकच शब्द लिहावा. भारतीय इतिहास आपल्याला सांगतो की, जेथे एकता नाही तेथे शत्रूपक्षाचा विजय झालेला आहे. **ह्या बेहदच्या रुद्र ज्ञान-यज्ञात विघ्न आणणारा आपल्या सर्वांचा सर्वात मोठा शत्रू विकाररूपी रावण! आपल्या सर्वांची एकी व एका श्रीमताने त्यावर विजय प्राप्त करूया. परमात्म्याच्या व परमात्म ज्ञानी यांच्या दृष्टिकोनातून हा कल्पातील सर्वात महान विजय असेल. तसे संपूर्ण विजयी आत्मे वैजयंती माळेचे मणी तर बनतीलच त्याचबरोबर ते आपली अंतिम कर्मातीत स्थितीही प्राप्त करतील.**

महाविनाशापूर्व राहिलेल्या अत्यल्प काळाचा विचार करता तीव्र गतीचाच नव्हे तर उडती कलाचा पुरुषार्थ करून आपली कर्मातीत स्थिती प्राप्त करावी. ज्याप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याला डॉक्टर होण्याचे लक्ष्य असते, ह्या लक्ष्य प्राप्तीसाठी तो रात्रंदिवस त्या विषयाचाच अभ्यास करतो, कॉलेजमधील मित्रांबरोबर त्या विषयाचीच चर्चा करीत असतो, झोपताना व जागे झाल्यावरही त्याला आपल्या लक्ष्याची विस्मृती होत नाही अशाप्रकारे अलौकिक अभ्यासाचा ध्यास साधकाने घेतला तर अहो सौभाग्य! लौकिक अभ्यासासाठी विद्यार्थ्याने ध्यास घेतला तर त्याला कोणी असे म्हणत नाही की, 'ह्याला अभ्यासाचे वेड लागले आहे!' परंतु अलौकिक अभ्यासासाठी मात्र कोणी ध्यास घेतला तर 'त्याला वेड लागले आहे' असे म्हटले जाते. बंधूंनो, कोणत्याही विषयाचे वेड लागल्याशिवाय त्याची परिपूर्ण प्राप्ती होत नाही. अशी परिपूर्ण प्राप्ती अलौकिक विषयात झाली की, आजचा वेडा उद्याचा सर्वात 'शहाणा माणूस' म्हणून समाज त्याला डोक्यावरही घेतो. कोणी निंदो अथवा वंदो; साधकाने मात्र आपला विश्वकल्याणी अभ्यास पूर्ण करून महाविनाश समयी विश्वाचा आधारमूरत बनावे. आधारमूरत बनावयाचे असेल तर एका परमात्म्याशिवाय अन्य कोणताही बंधनयुक्त आधार साधकाने घेऊ नये. संगमयुग आहेच बंधनमुक्त होऊन जीवनमुक्तीचा अलौकिक आनंद प्राप्त करण्याचे युग! असा अलौकिक आनंद लुटावयाचा असेल तर कर्मेंद्रियांच्या अधीन न होता कर्मेंद्रियांचा राजा बनून कर्म करावे. अशा ह्या राजाने आपल्या कर्मेंद्रियरूपी मंत्र्यांचा दरबार अवश्य भरवावा. असा दरबार भरविणाऱ्या राजांना बापदादांनी एका अव्यक्त वाणीद्वारे पुढील बारा प्रश्न विचारले होते. १) आत्मारूपी राजाचा कारभार ठीक चालला आहे ना? २) प्रतिदिन कर्मेंद्रियरूपी मंत्र्यांचा कारभार ठीक चालला आहे ना? ३) आपल्या राज्यदरबारात राज्यकारभारी (कर्मेंद्रिये) राज्यकारभाराची माहिती आपल्याला देत आहेत काय? ४) प्रत्येक राज्यकारभारी राज्याधिकाऱ्याच्या ऑर्डरमध्ये आहे काय? ५) काही कारभारी तुमच्या विरुद्ध आवाज उठवून खिटपिट तर करीत नाहीत ना? ६) तुम्ही राज्यकारभाऱ्यांच्या अधीन तर होत नाही ना? ७) ते आत्मा राजाला कोणता धोका तर देत नाहीत ना? ८) तुम्ही राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केल्यामुळे राज्यकारभारी तुमच्यावर शासन तर करीत नाही ना? ९) तुम्ही आपला हा सूक्ष्म दरबार रोज भरविता अथवा सवड मिळेल तसा भरविता? तुमचे दरबाऱ्यांच्यावर पूर्ण लक्ष आहे ना? १०) आपली प्रकृतीरूपी दासी मंथरेसारखे कोणते दुष्कर्म तर करीत नाही ना! ११) तुम्ही प्रकृतिजीत आत्मे प्रकृतिरूपी दासीच्या अधीन तर होत नाही ना? १२) आत्मा राजाच्या राज्यदरबाराची शोभा आहे अष्टरत्न! अर्थात अष्टशक्ति. ही अष्टरत्ने कार्यान्वित होऊन आपणास सहयोग देत आहेत काय? बापदादांनी विचारलेल्या ह्या बाराही प्रश्नांची उत्तरे सकारात्मक असतील तर त्या ब्रह्मावत्सांनी आपण योग्य दिशेने पुरुषार्थ करून स्थितीच्या अत्यंत समीप आलो आहोत असे समजावयास हरकत नाही.

बंधूंनो, **कर्मातीत स्थिती ही केवळ निश्चय, प्रतिज्ञा, त्यासंबंधीची प्रवचने अथवा लेख लिहून प्राप्त होणार नाही. त्यासाठी सखोल ज्ञानप्राप्ती बरोबरच निरंतर ज्ञानयुक्त व योगयुक्त स्थिती, स्वमान व वरदान स्वरूप बनण्याचा अभ्यास हवा. सर्वगुण सर्वशक्ती धारण करून साधकाला सर्वांगीण प्रभावमुक्त होण्याची आवश्यकता आहे.**

■■

# परमात्म्याचा सत्य परिचय

– ब्र.कु. चित्रा, सायन (मुंबई)

आपल्या जीवनात एकदा तरी ईश्वर भेटावा, किमान त्याचा साक्षात्कार व्हावा अशी सर्वसामान्य माणसाची उत्कट इच्छा असते. परंतु त्यासाठी नवविधा भक्ती किंवा कठीण तपस्या करणे आवश्यक आहे, ही गोष्ट साधु–संताच्या, महात्म्यांच्या जीवन चरित्रावरून त्याच्या लक्षात येते. आपल्या धावपळीच्या दैनंदिन जीवनात तसे करणे अशक्य आहे; हे मनोमन पटल्याने तो खिन्न व हताश होतो. यातून त्याला एकच मार्ग सापडतो, तो म्हणजे वेळात वेळ काढून देवपूजा करणे व सणासुदीला देवळात जाऊन देवदर्शन घेणे. यातच मनुष्य समाधान मानतो.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे शिव–शंकर, ब्रह्मा, विष्णु, जगदंबा, श्रीलक्ष्मी सरस्वती, दुर्गा, काली, श्रीकृष्ण, श्रीराम, गणपती, हनुमान... ही सर्वच देवाची निरनिराळी रूपे आहेत; हीच श्रद्धा प्रचलित असल्याने, सर्वसामान्य मनुष्य ज्या घरात अथवा वातावरणात वाढतो तशीच देवाची कल्पना त्याच्या मनात आकार घेत जाते. पुढे मोठा झाल्यावर त्या इष्ट देवांचीच तो पूजा करू लागतो. नेमका ईश्वर कोण आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्नही तो करीत नाही. याविषयी समर्थ रामदासांनी अतिशय सुंदर शब्दात वर्णन केले आहे –

**जया मानला देव तो पूजिताहे।**
**परी देव शोधूनि कोणी न पाहे ।**
**जगी पाहता देव कोट्यानुकोटी।**
**जया मानली भक्ती जे तोचि मोठी।।**

अशारितीने द्वापर आणि कलियुगात मनुष्य ईश्वराची भक्ती करीत असतो. परंतु ईश्वराला तो यथार्थ जाणत नसतो. पुढे कलियुगाचे अंती तर तो प्रकृतीच्या पाच तत्वांचीदेखील पूजा करू लागतो. परिणामी भक्ती व्यभिचारी बनते. या काळात काम–क्रोधादी विकार उग्र रूप धारण करतात. त्यामुळे या सृष्टीची तमोप्रधान अवस्था होते. मानव धर्मभ्रष्ट व कर्मभ्रष्ट बनतो. धर्माची अति ग्लानी होते. **अशावेळी गीतेतील वचनानुसार (यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत...) निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण 'प्रजापिता ब्रह्मा' यांच्या साकार शरीरात होते. परमात्मा, ब्रह्मामुखाद्वारे सत्य गीता ज्ञान व राजयोगाचे शिक्षण देतात. त्याद्वारेच पतित मनुष्य आत्मा पावन बनतो**. तसेच परमात्मा पिता सर्व आत्म्यांना मुक्ती व जीवनमुक्तीचे वरदान देतो. परमात्मा सर्व आत्म्यांचा माता–पिता असल्याने, तो कोणत्याही मातेच्या गर्भातून जन्म घेत नाही. प्रजापिता ब्रह्माच्या शरीरातील परकाया प्रवेशाला त्याचा दिव्य जन्म अथवा अवतरण असे म्हटले जाते. तसेच परमात्मा ज्याच्या शरीरात प्रवेश करतो, त्या प्रजापिता ब्रह्माबाबांचे प्रतीक म्हणून शिवलिंगासमोर 'नंदी' दर्शविण्यात येतो. परमात्मा शिव अवतरित होऊन आपल्या ज्ञान, योग व पवित्रतेद्वारे आत्म्यात आध्यात्मिक जागृती उत्पन्न करतात. त्याच्या स्मृत्यर्थ भक्तलोक महाशिवरात्रीला जागरण करतात.




यावरून आपल्या लक्षात आले असेल की परमात्मा निराकार ज्योतिस्वरूप आहे. त्याचेच प्रतीक शिवलिंग वा ज्योतिर्लिंगाच्या रूपाने मंदिरात पूजले जाते. भारतात द्वादश ज्योतिर्लिंगे सुप्रसिद्ध आहेत. परमात्मा सर्व आत्म्यांचा पिता आहे. सर्व गुणांचा सागर आहे, सर्व शक्तिवान आहे. तो सर्वव्यापी नसून परमधामचा निवासी आहे. तोच ब्रह्माद्वारे नवसृष्टीची स्थापना, विष्णुद्वारे नवसृष्टीची पालना शंकराद्वारे पुरानी पतित सृष्टीचा महाभारी विनाश करवितो. तोच कलियुगी पवित्र सृष्टीला पावन

▶ पान नं. ३० वर



# हे शेतकरी बांधवा! तूच तुझ्या भाग्याचा अधिकारी

**- ब्र.कु. नागेश, पांडवभवन, मा. आबू**

शेतकऱ्याला मराठीत व संस्कृतमध्ये 'कृषक' म्हणतात. तर हिंदीमध्ये 'किसान' म्हणतात. या दोन शब्दांमध्ये अतिशय गुह्य रहस्य सामावले आहे. 'कृषक' हा शब्द 'कृष्ण' शब्दाशी मिळता-जुळता आहे, तर 'किसान' हा शब्ददेखील 'किसन' (अर्थात पुन्हा एकदा श्रीकृष्णाशी) या शब्दाशी साधर्म्य साधतो. जेव्हा श्रीकृष्ण बासरी वाजवायचे तेव्हा ते आपल्या सुमधुर बसरी वादनाने सर्व गोप-गोपिकांना मंत्रमुग्ध करायचे, त्यांच्यासोबत रास खेळायचे. अगदी त्याचप्रमाणे शेतकरी जेव्हा शेतात नांगर चालवितो, तेव्हा शेतात विविध धान्यांची पिके डोलायला लागतात, शेतकऱ्याबरोबर नाचायला लागतात. आणखी असेही आपण भागवतात वाचलेच आहे की, श्रीकृष्ण हा गोकुळात म्हणजे ग्रामीण भागात राहणारा, अर्थात तो एक प्रकारे शेतकरीच होता. तेव्हा शेतकरी बांधवांनो, तुम्ही कोणी साधारण मानवमात्र नसून मानव सृष्टीवर साक्षात परमेश्वराचे प्रतिनिधी आहात. श्रीकृष्णाचे वंशज आहात.

**परमेश्वराला 'सृजनकर्ता' व 'पालनकर्ता' म्हटले जाते. या भूगर्भात विविध धान्यांचे बीजारोपण करून धनधान्य पिकविणारे तुम्ही खऱ्या अर्थाने या सृष्टीतलावरचे 'सृजनकर्ता' आहात. धनधान्याचे 'कुबेर' आहात. पिकविलेल्या धनधान्यापासून न केवळ समस्त मानवजातीचे, अपितु सर्व प्राणीमात्रांचेही पालन-पोषण तुम्ही करता, तेव्हा तुम्हीच वास्तविक 'पालनकर्ते' देखील आहात.**

असे म्हणतात की, जेव्हा लोखंडाला परिस स्पर्श होतो तेव्हा लोखंडाचे सोने होते. अगदी त्याचप्रमाणे, तुम्ही शेतकरी खरे 'परिसमणी' आहात. तुम्ही शेतात अखंड परिश्रम करता, घाम गाळता आणि या मातीतून सोने पिकविता. तुम्ही 'भोले भंडारी आहात.' जसे शिव भोले भंडारी अगदी सहजरित्या प्रसन्न होतो व आपल्या भक्तांचे भंडार भरपूर करतो, तसेच तुम्ही देखील मूठभर धान्यातून अनेक पटीने धान्य पिकविता व धनधान्याचे भंडार भरपूर करता.

ज्याप्रमाणे एखादा डॉक्टर असाध्य रोगापासून रुग्णाची मुक्तता करतो, त्याला बरे करतो, त्याला पुनर्जीवन देतो तेव्हा त्या रुग्णासाठी व त्याच्या नातलगांसाठी तो डॉक्टर, परमेश्वराचे रूप असतो. त्याचप्रमाणे, शेतात अथक कष्ट करून धनधान्य पिकवून समस्त मानवमात्रांचे जीवन चालविणारा असा

---

**तुम्ही शेतात अखंड परिश्रम करता, घाम गाळता आणि या मातीतून सोने पिकविता. तुम्ही 'भोले भंडारी आहात.' जसे शिव भोले भंडारी अगदी सहजरित्या प्रसन्न होतो व आपल्या भक्तांचे भंडार भरपूर करतो, तसेच तुम्ही देखील मूठभर धान्यातून अनेक पटीने धान्य पिकविता व धनधान्याचे भंडार भरपूर करता.**

**शेतात अथक कष्ट करून धनधान्य पिकवून समस्त मानवमात्रांचे जीवन चालविणारा असा हा सर्वांचा पालनकर्ता शेतकरी, हा त्या मानव मात्रांसाठी या पृथ्वीतलावर प्रति-परमेश्वर नाही का?**



**कोशिश करने वालों की कभी हार नही होती।**

हा सर्वांचा पालनकर्ता शेतकरी, हा त्या मानव मात्रांसाठी या पृथ्वीतलावर प्रति-परमेश्वर नाही का? याचेच गायन एका कवीने सुंदर शब्दात केले आहे-

**सृष्टीचा सृजनकर्ता,**
**पालनकर्ता तूच शेतकरी।**
**भुकेलेल्यांची भूक भागवितो,**
**तूच ती गोल भाकरी।।**
**ना कोणाची नोकरी,**
**नाही कोणाची चाकरी।**
**नाही कोणाच्या अधीन तू,**
**तूच खरा अधिकारी ।।**
**धनधान्याची रास जणू या**
**अभंगाच्या ओवी।**
**उदराकडून हृदयाकडे नेई,**
**तूच दिव्य वारकरी।।**
**ऊन-वारा-पाऊस,**
**तू सर्व काही सहन करी ।**
**घाम गाळून मोती पिकवी,**
**तूच तो परोपकारी ।।**

पूर्वी असे म्हणायचे की, शेती करणे म्हणजे सर्वोत्तम, धंदा करणे मध्यम ठीक-ठाक व नोकरी करणे म्हणजे कनिष्ठ. परंतु आज परिस्थिती बदलली आहे. अनेक शेतकरी आपल्या शेतजमिनी विकून शहराकडे कूच करू लागले आहेत. **आज नैसर्गिक प्रकोप, सरकारी अनास्था, नैसर्गिक साधनांचे अयोग्य नियोजन वा अभाव आदी विविध कारणांमुळे शेतकऱ्याचा शेती करण्यात रस कमी होत चाललेला दिसत आहे. आर्थिक विवंचनेत आजचा शेतकरी सापडला आहे. बँक वा सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडण्यास तो असमर्थ ठरतो आहे. मग त्याला या संकटापासून सुटण्याचा कोणताही उपाय समोर दिसत नसल्याने आत्म-हत्या करून स्वतःची सुटका करून घेण्याचा मार्ग सापडतो.**

परंतु मनात प्रश्न येतात की,

१. जगातील कोणत्याही प्रकारच्या संकटांवर मात करता येते की नाही?
२. संकटांना तोंड देण्यास केवळ आत्म-हत्या हाच पर्याय उरतो का?
३. आत्म-हत्या केल्याने जीवनातील सर्व प्रश्न सुटतात का?

हे माझ्या प्रिय शेतकरी बांधवांनो, चला तर मग, वरील प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी थोडेसे आत्म-चिंतन करू या. सर्वप्रथम आपण हे जाणून घेतले पहिजे की, या जगातील सर्व समस्या या मानव निर्मितच आहेत. आणि जर एखादी समस्या, एखादा प्रश्न मानवाने निर्माण केला असेल तर त्या समस्येचे समाधान, त्या प्रश्नाचे उत्तरही आपणाजवळच आहे. अर्थात या जगात काहीही अशक्य असे नाही. म्हणजेच सर्व काही शक्य आहे. सर्व समस्यांचे समाधान आहे. फक्त संकटावर मात करण्याची ताकद, परिस्थितींचा सामना करण्याचे अदम्य साहस आपल्यात पाहिजे.

हिंदी भाषेतील सुप्रसिद्ध म्हण आहे कवि हरिवंशराय बच्चनजी यांच्या सुंदर काव्य-पंक्ती आहेत:

**लहरों से डर कर नौका पार**
**नहीं होती,**

अशीही एक प्रचलित म्हण आहे की, 'हिम्मते मर्दा, मददे खुदा.' अर्थात जर माणसाकडे हिंमत असेल तर त्याला या जगात कोणत्याही समस्येला तोंड देण्याचे साहस, ईश्वरीय मदत प्राप्त होते. माझ्या जीवनात घडत असलेल्या चांगल्या-वाईट गोष्टींमध्ये कल्याणच सामावले आहे. माझे अकल्याण, माझे अहित, वाईट कधीही होऊ शकत नाही- हा दृढ-विश्वास आपण निरंतर मनात बाळगला पाहिजे. मनाची ताकद ही जगातील सर्वश्रेष्ठ ताकद आहे. 'मन के हारे हार जगत में, मन के जीते जीत' अर्थात जर आपण मनाने हार मानली तर हार होणार आणि या उलट जर आपल्या मनाने ठरविले की आपला विजय निश्चित आहे, तर आपणास जगातील कोणतीही गोष्ट हरवू शकत नाही. यालाच म्हणतात- 'मन जीते जगत्‌जीत.'

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली, केवळ आणि केवळ अतूट हिमतीच्या जोरावर. त्यांच्या मार्गात पर्वतांएवढी अनेकानेक संकटं आली, परंतु त्यांनी न डगमगता सर्व समस्यांवर मात केली. महात्मा गांधीनी भारताला स्वातंत्र्य प्राप्त व्हावे यासाठी किती विरोध

पत्करला, शक्तिशाली ब्रिटीशांविरुद्ध ते सतत अहिंसक मार्गाने लढत राहिले. अशी कित्येक महान व्यक्तींची उदाहरणे आपणास येथे देता येतील. तात्पर्य हेच आहे की, हिंमत, साहस व धैर्यता हे गुण अंगीकारल्यास जीवनात खचून न जाता सर्व समस्यांना सहज तोंड देता येते.

लक्षात ठेवा, आपले कल्याणकारी परमपिता शिव पिता आपणां सर्व मनुष्यात्म्यांचे कल्याण करण्यासाठी आले आहेत. स्वतः सर्व शक्तिवान परमात्मा आपला मित्र, आपला सखा, आपला साथी बनून आले आहेत, तेव्हा कशाची चिंता आणि कशाची भीती?

**जिसका साथी हो भगवान**
**उसको क्या रोकेंगे आँधी और**
**तूफान।**

हे माझ्या प्रिय शेतकरी बांधवांनो! आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, आपल्या मर्यादित स्वार्थापायी आपण या जमिनीचा वाटेल तसा, वाटेल त्या मार्गाने दुरुपयोग केला. रासायनिक खतांचा अति प्रमाणात वापर, रासायनिक कीटकनाशकांचा बेछूट वापर करून पिकांचे उत्पादन घेण्याचा अट्टाहास केला. पाण्याचा अति वापर केला. जमिनीचा पोत कमी झाला. जमीन नापीक होत गेली. निसर्गाचा दुरुपयोग केल्याने प्रकृतीचे पाच तत्त्व (जल, वायु, अग्नि, आकाश, पृथ्वी) मानवमात्रावर नाराज झाले, अशांत झाले व त्यांनी आपला संताप, प्रकोप व्यक्त करण्यास सुरुवात केली.

**तेव्हा हे आपण लक्षात घेतले पाहिजे की, परमात्मा काही हे नैसर्गिक प्रकोप घडवून आणत नाही. हे तर मानव निर्मित आहेत. मानवाने निसर्गावर केलेल्या अमर्याद अत्याचारांचे हे दुष्परिणाम आज आपणास बघावयास मिळत आहेत. यात सुखकर्ता-दुःखहर्ता परमात्मा पित्याचाही हात नाही. ज्याप्रमाणे दारूच्या व्यसनाने, अतिसेवनाने एखाद्या व्यसनीचे यकृत (लिव्हर) हे कालांतराने बिघडते, खराब होते, निकामी होते अगदी त्याचप्रमाणे मानवाने आपल्या अल्पकालीन स्वार्थापायी केलेल्या या प्राकृतिक साधनांच्या अतिव्ययामुळे आज ही प्रकृती बिघडली आहे. या सर्व प्राकृतिक प्रकोपांचे मूळ स्वतः मानव आहे; मानवी स्वार्थ आहे. यात परमात्म्याचा दोष तो काय? तो तर 'सदाशिव' आहे अर्थात सदा सर्वदा सर्वांचा कल्याणकारी पिता आहे.**

हे कृषक-बंधुंनो! आपण हे ध्यानात घेतले पाहिजे की, शेती हा काही व्यवसाय नाही. शेतजमीन ही काही मशीन (यंत्र) नाही. लक्षात ठेवा- शेती हा सर्वोच्च सेवेचा प्रकार आहे. समस्त प्राणीमात्रांच्या उदर भरणाचे पुण्यप्रद सेवेचे साधन आहे. शेतजमीन ही आपली माता आहे, ती सदैव आपल्या मुलाचे हितच पाहते. तेव्हा या धरतीमातेचा आदर करायला शिकले पाहिजे. तिचा योग्य तो सन्मान केला पाहिजे. **या वसुंधरेला प्रेमाने, आपुलकीने जोपासले पाहिजे, तिची काळजी घेतली पाहिजे. आपले पालन-पोषण करणाऱ्या या भू-मातेच्या आरोग्याची सर्वो तोपरी निगा राखली पाहिजे. सेंद्रिय खतांनी, शेणखताने तिचा पोत सुधारला पाहिजे. गांडूळ खताचा वापर केला पाहिजे. रासायनिक खत-कीटकनाशकांचा वापर टाळून, नैसर्गिकरित्या मुबलक प्रमाणात मिळणाऱ्या गोमुत्राचा कीटकनाशक म्हणून उपयोग केला पाहिजे.**

भारतमातेच्या रक्षणासाठी रात्रन्दिवस देशाच्या सीमेवर आपले सैनिक, जवान न थकता सदैव सजग राहून पहारा देतात. त्याचप्रमाणे या भू-मातेचे, तिचा पोत सुधारण्याचे, तिचे निकृष्ट होण्यापासून, नापिक होण्यापासून रक्षण करण्यासाठी तुम्ही आता सजग राहिले पाहिजे. परिस्थितीला घाबरून न जाता निडर, निर्भय होऊन तिचे रक्षण केले पाहिजे.

'जय जवान, जय किसान, ही धरती आम्हा मातेसमान' - हा जयघोष, हा नारा हे प्रिय बळी राजा, तुझ्या प्रत्येकाच्या हृदयात सदैव निनादत राहू दे. हीच खरी धरती-मातेची पूजा आहे. हाच खरा तिचा सन्मान आहे. याच भक्तिभावाने, आदराने प्रेमभावनेने केलेली शेती या भू-मातेची खरी सेवा होय. हाच खरा सन्मान होय.

**'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि**



**भारतमातेच्या रक्षणासाठी रात्रन्दिवस देशाच्या सीमेवर आपले सैनिक, जवान न थकता सदैव सजग राहून पहारा देतात. त्याचप्रमाणे या भू-मातेचे, तिचा पोत सुधारण्याचे, तिचे निकृष्ट होण्यापासून, नापिक होण्यापासून रक्षण करण्यासाठी तुम्ही आता सजग राहिले पाहिजे.**

**जीवनाला कंटाळून, नैराश्यातून अथवा अन्य कारणांनी मनुष्य आत्मा जेव्हा स्वतःचे हे शरीर निसर्ग-नियमांच्या विरुद्ध जबरदस्तीने सोडतो, तेव्हा त्याला सामान्य भाषेत 'आत्म-घात' वा 'आत्म-हत्या' असे म्हणतात.**



**गरियसि' - अर्थात आपल्याला जन्म देणारी आई व आपण जेथे जन्माला आलो ती जन्मभूमि आम्हास स्वर्गापेक्षा अधिक गौरवशाली आहे, अभिमानास्पद आहे.** ही प्रत्येक भारतीयाची मनोधारणा आहे. त्याचप्रमाणे ही धरतीदेखील आमची माता आहे. जन्म देणाऱ्या मातेपेक्षाही बाळाचे पालन-पोषण करणारी अशी ही धरती-माता आम्हा भूमिपुत्रांना (शेतकऱ्यांना) अधिक सन्माननीय आहे, वंदनीय आहे. पूजनीय आहे. **नैसर्गिक पद्धतींचा वापर करून केलेली शेती आणि शाश्वत योगिक शेती पद्धतीने केलेली शेती हीच या भू-मातेची सर्वोच्च सेवा आहे, आम्हा शेतकऱ्यांचा स्वधर्म आहे.**

परंतु आज आपण पाहतो ते चित्र अत्यंत हृदयविदारक आहे. दरवर्षी भारतात हजारो शेतकरी आत्महत्या करताना दिसत आहेत. वास्तविक आत्महत्या करणे हे महापाप आहे. जीवनाला कंटाळून, नैराश्यातून अथवा अन्य कारणांनी मनुष्य आत्मा जेव्हा स्वतःचे हे शरीर निसर्ग-नियमांच्या विरुद्ध जबरदस्तीने सोडतो, तेव्हा त्याला सामान्य भाषेत 'आत्म-घात' वा 'आत्म-हत्या' असे म्हणतात. परंतु आपण जाणतो की आत्मा अमर आहे. तेव्हा 'आत्म-घात' असे म्हणणे साफ चुकीचे आहे. वास्तविक याला 'जीवन-घात' असे म्हटले पाहिजे. कारण विनाश हा जिवाचा अर्थात शरीराचा होतो, आत्म्याचा नाही. मनुष्यात्म्याने केलेल्या चांगल्या-वाईट कर्मांचा लेखा-जोखा आत्मा आपल्याबरोबर नेत असतो आणि त्या कर्मांनुसारच त्या मनुष्यात्म्याचा पुढील जन्म निश्चित होत असतो. तेव्हा आत्मा हा काही निर्लेप नाही, त्याने केलेल्या चांगल्या-वाईट कर्मांचा लेप-छेप आत्म्यालाच लागतो.

निसर्ग-नियमानुसार जर एखाद्या मनुष्यात्म्याचा जीवनप्रवास हा ७० वर्षांचा आहे आणि त्या मनुष्यात्म्याने शारीरिक वयाच्या ४० व्या वर्षी जीव-घात केला तर त्या मनुष्यात्म्याला पुढील ३० वर्षे शरीर प्राप्त होत नाही. अर्थात मातेच्या गर्भाद्वारे जन्म मिळत नाही. तसेच निसर्ग-नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल झालेल्या या महा पापकर्माचे भोग भोगावे लागणार ते वेगळेच. तेव्हा जो कोणी जीव-घात करतो, तो सांसारिक जबाबदारीतून मुक्त न होता अधिकच महा पापकर्माचा भागीदार होतो. हे अमीट सत्य न केवळ शेतकऱ्यांनी परंतु सर्वांनीच आपल्या मन-बुद्धीत कोरून ठेवले पाहिजे, जेणेकरून अशा महा पापकर्मापासून आपण दूर राहू.

आपण सर्वांनीच आपल्या या अमूल्य मानव-जीवनाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. ज्याप्रमाणे एखाद्या परीक्षेत नापास झाल्यावर त्या विद्यार्थ्याला पुन्हा एकदा त्या परीक्षेत पास होण्यासाठी संधी उपलब्ध होते, अगदी त्याचप्रमाणे आपण पूर्वजन्मात केलेल्या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी आपणास हा वर्तमान मानव-जन्म एका सुवर्ण संधीच्या रूपात प्राप्त झाला आहे. तेव्हा परत-परत त्याच चुका करून नापास होण्यात बुद्धिमानी ती कसली? या संधीचे सोने आपण केले पाहिजे. **जीवनात येणाऱ्या समस्यांना धैर्याने, साहसाने, हिमतीने व बुद्धि-चातुर्याने तोंड दिले पाहिजे. आळसाची मरगळ झटकून, नैराश्याची धूळ झटकून, उराशी दैदीप्यमान स्वप्नं बाळगून जीवनात आशेचा उषःकाल होऊ द्या, नवचैतन्याचा संचार होऊ द्या. आनंद-सुख-समाधानाचे पिक या जीवन-धरतीवर बहरू द्या, डोलू द्या.**

चला तर मग, आपल्या हृदयात परमात्म-पित्याचा नित्य निवास अनुभव करू या, उमंग-उत्साहाचा श्वास घेऊ या, स्वतःच्या कार्यक्षमतेवर, स्वतःच्या शक्तींवर अतूट आत्म-विश्वास ठेऊ या आणि शेतीच्या या गौरवशाली परंपरेचा इतिहास घडवू या.

**हे माझ्या प्रिय शेतकरी बांधवांनो, चला तर आता हे जाणून घेऊ या, मानू या व अनुभव करू या की, स्वतः परमात्मा शिव पिता नित्य माझ्यासोबत**





**श्रेष्ठ सकारात्मक विचारांचे बीज मी माझ्या मनरूपी धरणीवर पेरत आहे... सुख-शांती- आनंद-प्रेम-शक्ती आदी दिव्य गुणांची पिकं या मनरूपी धरणीवर बहरली आहेत.**

**आहे. मी एकटा नाही. परमात्मा माझा सर्व संबंधी आहे.** खुदा दोस्त माझ्या पाठीशी नसून सतत माझ्यासोबत आहे. माझ्यात नव्या शक्तीचा संचार होत आहे. मी आता शक्तिशाली स्थितीचा अनुभव करीत आहे. माझे मन शुद्ध, पवित्र विचारांनी भरले आहे. माझे मन बलशाली झाले आहे. माझा जणू पुनर्जन्म झाला आहे. माझ्या मनात नित्य अतूट उमंग-उत्साहाचा, नवचैतन्याचा झरा अविरत वाहत आहे. माझ्या जीवनातील सर्व समस्या मी माझ्या अविनाशी साथीला (परमात्म्याला) अर्पण केल्या आहेत. माझ्या सर्व समस्यांचे ओझे मी त्या सर्वशक्तिवानाला दिले आहे. मी आता निश्चिंत आहे. श्रेष्ठ सकारात्मक विचारांचे बीज मी माझ्या मनरूपी धरणीवर पेरत आहे... सुख-शांती-आनंद-प्रेम-शक्ती आदी दिव्य गुणांची पिकं या मनरूपी धरणीवर बहरली आहेत परमात्म-मीलनाच्या आनंदात नाचत आहेत. डोलत आहेत... मी आता एक आदर्श शेतकरी झालो आहे... मी शेतकरी या मानवसृष्टीचा सृजनकर्ता आहे... मी या सृष्टीचा पालनकर्ता आहे... सारे विश्व माझ्याकडे मोठ्या आशेने बघत आहे... समस्त विश्वाचे पोट भरण्याचे महान कार्य, क्षुधा-शांती करण्याचे पुण्य-कर्म मी करीत आहे... परमेश्वराने मला या विशेष कार्यासाठी निवडले, यासाठी मी परमेश्वराचा सदैव आभारी आहे... मी या धरतीमातेचाही शतशः आभारी आहे. ही धरतीमाता सदैव या बालकाचे लाड पुरवित असते... मला कधीही काहीही कमी पडू देत नाही... जल, वायु, अग्नि, आकाश हे प्राकृतिक तत्त्वदेखील माझे सहयोगी आहेत... समस्त विश्वाची भूक मिटविण्याच्या पुण्यकार्यात मला नित्य मदत करीत आहेत... या तत्त्वांचे देखील धन्यवाद!

**मला शेतकरी असल्याचा स्वाभिमान आहे... माझ्यात नव-ऊर्जेचा संचार झाला आहे... मीच माझ्या जीवनाचा, माझ्या भाग्याचा अधिकारी आहे, भाग्यविधाता आहे... मी माझ्या परमपित्याकडे ही प्रार्थना करतो की, मला जन्मोजन्मी समस्त विश्वाची भूक शांत करणारा असा पुण्यवान शेतकरी बनव... हे परमेश्वरा, तुझे पुनश्च कोटी-कोटी धन्यवाद!!!** ■■

▶ पान नं. २५ वरुन

बनवितो, त्याचेच गायन–पूजन सर्व धर्मातून केले जाते.

ख्रिस्ती धर्माचा धर्मस्थापक येशू ख्रिस्त 'गॉड इज लाईट' (परमात्मा प्रकाश स्वरूप आहे.) म्हणत असे. पारसी धर्माचे लोक परमात्म्याला अग्नी किंवा ज्योतिस्वरूप मानतात. मुसलमान धर्माचे लोक परमात्म्याला अल्लाह नूर म्हणजे प्रकाश स्वरूप मानतात. शीख धर्माचा संस्थापक गुरुनानक यांनीही परमात्म्याला एक निराकार ज्योतीच मानले आहे. तात्पर्य म्हणजे सर्व धर्म परमात्म्याला प्रकाश स्वरूप मानतात. परंतु वर्तमान कलियुगात मनुष्य देहअभिमानामुळे आपल्या धर्मालाच सर्वश्रेष्ठ मानतो व दुसऱ्या धर्माला कमी लेखतो. त्यामुळे धर्माच्या नावाखाली मानव अधर्माचे आचरण करतांना दिसतो. याला मुख्य कारण म्हणजे स्वत:च्या आत्मस्वरूपाला तसेच परमात्मा पित्याला पूर्णत: विसरून गेला आहे. परिणामत: अनाथ बनल्याने, दु:ख भोगत आहे. आज सारी सृष्टी दु:खधाम बनली आहे. **अशावेळी आपल्या आत्मारुपी मुलांचे दु:ख दूर करून, त्यांना सदा सुखी करण्यासाठी, दु:खहर्ता–सुखकर्ता शिव परमात्म्याने हाच संदेश दिला आहे - 'माझ्या प्रिय मुलांनो, देहसहित देहाचे सर्व संबंध विसरून, स्वत:ला आत्मा समजून, माझी (परमधाममध्ये) आठवण करा, म्हणजे तुमच्या विकर्मांचा विनाश होऊन, तुम्ही पावन बनाल व आपल्या घरी परमधाममध्ये परत जाल. नंतर विश्व नाटकातील पार्ट अनुसार स्वर्गात (सुखधामात) याल'.** हा ईश्वरी संदेश लक्षात घेऊन प्रत्येकाने योगबळाद्वारे पावन बनण्याचा तीव्र पुरुषार्थ करण्याची आवश्यकता आहे. अधिक माहितीसाठी जिज्ञासूंनी जवळच्या 'ब्रह्माकुमारीज्' सेवाकेंद्राला अवश्य भेट द्यावी. या अनुषंगाने पुढील गीताच्या ओळी स्मरतात.

**शिवांनी माझा, मी ही शिवांचा**
**परिचय पुरता केला हो ।**
**मी बाबांचा, बाबा माझे, निश्चय**
**पक्का झाला हो।।**

■■

(अनुभव)

# राजयोग- जीवन जगण्याची कला



**ब्र. कु. रामकृष्ण महाले,**
निवृत्त कारागृह अधीक्षक, वाशिम

ब्र. कु. रामकृष्ण महाले हे ठाणे येथील कारागृहात सन १९९८ ते २००१ या काळात अधीक्षक पदावर कार्यरत होते. त्यावेळी त्यांनी हजारो कैदी बांधवांना राजयोगाचे प्रशिक्षण देऊन त्यांच्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणले. राजयोगाचे प्रशिक्षण देण्यासाठी ठाणे सेवाकेंद्रातील ब्रह्मावत्स रोज जात असत. फलस्वरूप बरेच कैदी बांधव व्यसन व विकारांपासून परावृत्त होत गेले. कित्येकजण सकाळी अमृतवेळेला ४ ते ५ यावेळेत योगाचा अभ्यास सुद्धा करू लागले होते. त्यामुळे कैदी बांधवांच्या जीवनात अद्‌भुत परिवर्तन घडून आले होते. हे परिवर्तन पाहून, अनेक कारागृहात अशा प्रकारचे उपक्रम हाती घेण्यात आले व खऱ्या अर्थी कारागृहाला 'दिव्य सुधारगृहाचे' स्वरूप प्राप्त झाले. परिणामतः राजयोगाच्या अभ्यासाने कैदी बांधवांचे कवडीतुल्य जीवन हिरेतुल्य बनले. आजही ठाणे कारागृहातील कैदी बांधवांची ईश्वरी सेवा मोठ्या प्रमाणावर चालू आहे; ही खरोखर मोठी आनंदाची गोष्ट आहे.

**- संपादक**

सन १९९३ मध्ये मी प्रशासक वर्गासाठी आयोजित शिबीरासाठी मा. आबू येथे गेलो होतो. तेथे मला ईश्वरी ज्ञान प्राप्त झाले. तेथून परत आल्यावर मी जवळच्या सेवाकेंद्रावर जाऊन साप्ताहिक कोर्स पूर्ण केला व नियमित मुरली क्लाससाठी सेवाकेंद्रावर जाऊ लागलो. तेव्हा माझ्या हे लक्षात आले की राजयोग ही जीवन जगण्याची सर्वश्रेष्ठ कला आहे. ही जर कारागृहातील कैदी बांधवांना शिकविण्यात आली तर त्यांचे जीवन खऱ्या अर्थी परिवर्तित होईल. या उद्देश्याने मी जेलमध्ये प्रयोगाला सुरुवात केली. त्यांच्यासाठी साप्ताहिक कोर्सचे आयोजन केले. त्यांना राजयोगाचे विधीवत शिक्षण देण्यात आले. सुरुवातीला कैद्यांच्या जीवनात राजयोगाच्या अभ्यासाने २५% परिवर्तन दिसून आले. हळू-हळू ही टक्केवारी वाढत गेली. परिणामतः बरेच जण व्यसनमुक्त झाले. काही कैदी बांधव तर कालांतराने पूर्णपणे राजयोगी बनले. याचा कारागृहातील वातावरणावर खूपच चांगला परिणाम झाला. जेलमधील अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच कैदी बांधव यांच्यात सामंजस्याची भावना निर्माण झाली. जेलमध्ये शांतीपूर्ण वातावरण व शुभभावनेचा फैलाव होत गेला. एकंदरीत ईश्वरी ज्ञानाने कैदी बांधवांच्या जीवनात संजीवनी बुटीचे काम केले होते. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे कित्येक कैद्यांनी तर जेलमधून सुटल्यानंतर आपले अनुभव शासनाला कळवले होते. हे सर्व जवळून पाहताना, मला जो आनंद होत होता, त्याचे वर्णन करणे खरोखर अशक्य आहे. कैदी बांधव जेव्हा कारागृह सोडून जात, तेव्हा ते मला खास भेटायला येत असत तसेच जेलमधील वास्तव्यात ईश्वरी ज्ञानाद्वारे स्वतःमध्ये कसे आमूलाग्र परिवर्तन झाले, हे कथन करीत असत. येवढंच नव्हे तर मी यापुढेही सेवाकेंद्रावर नियमित जाईन, असे आश्वासन देत असत. त्यावेळी खरोखर मन भरून येत असे. शिवबाबांनी मला या महान कार्यासाठी निमित्त बनविले, याचा अपार आनंद होत असे. बघता-बघता सन १९९३ ते २००१ हा आठ वर्षाचा काळ लोटला व ऑक्टोबर २००१ मध्ये मी ठाणे येथून सेवानिवृत्त झालो. सन २००१ मध्ये ठाणे महानगर पालिकेतर्फे मला स्मृतिचिन्ह व ठाणे गुणीजन सन्मान पत्र प्रदान करण्यात आले होते.

निवृत्तीनंतरच्या काळातही आपल्या हातून अशीच ईश्वरी सेवा होत रहावी, ही खूप इच्छा होती. त्यामुळे दोन ठिकाणी गीता पाठशाळा उघडण्यासाठी शिवबाबांनी मला निमित्त बनवले. तेथे बऱ्याच जणांनी साप्ताहिक कोर्स पूर्ण केला

**शिवबाबांनी मला या महान कार्यासाठी निमित्त बनविले, याचा अपार आनंद होत असे. बघता-बघता सन १९९३ ते २००१ हा आठ वर्षाचा काळ लोटला व ऑक्टोबर २००१ मध्ये मी ठाणे येथून सेवानिवृत्त झालो.**




**आणखी दोन ठिकाणी नवीन गीता पाठशाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. अशाप्रकारे राजयोगाद्वारे आपल्याला जी प्राप्ती झाली, तीच इतरांनाही व्हावी, हीच मंगलकामना !**

व ते नियमितपणे ज्ञानमुरलीचे श्रवण करतात. आणखी दोन ठिकाणी नवीन गीता पाठशाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. अशाप्रकारे राजयोगाद्वारे आपल्याला जी प्राप्ती झाली, तीच इतरांनाही व्हावी, हीच मंगलकामना!

मी व माझी युगल मागील २२ वर्षासून ज्ञानमार्गात असून, नियमितपणे अभ्यास करीत आहोत; त्यामुळे आमच्या जीवनात ज्या समस्या व संकटे आली, त्यांचे योगबळाने सहज निवारण होत गेले. याविषयी काही निवडक अनुभव मी आपल्यासमोर मांडू इच्छितो.

मला २२ वर्षापूर्वी असलेला कमरेचा त्रास अचानक पुन्हा उद्‌भवला. प्राथमिक स्वरूपाचे उपचार करूनही त्रास काही कमी होत नव्हता. त्यामुळे शिवबाबांच्या प्रेरणेनुसार ऑपरेशन करायचे ठरवले. सदरचे ऑपरेशन अकोला येथील आर्थोपेडीक सर्जन श्री. सतीश स्वामी यांच्याद्वारे करण्यात आले. बाबांच्या कृपेने ते पूर्णत: यशस्वी झाले. तेव्हापासून मला कसलाही त्रास झाला नाही. त्याचबरोबर माझी प्रकृतीदेखील झपाट्याने पूर्ववत झाली.

दुसरा प्रसंग म्हणजे दोन वर्षापूर्वी माझी युगल  सुमन हिला मेंदूजवळ गाठ असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे तिला मुंबई येथील के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. सदरचे ऑपरेशन करण्यापूर्वी डॉक्टर्सनी तीन संभाव्य धोके सांगितले होते. १) स्मृती गायब होण्याची शक्यता. २) पॅरालिसिस (अर्धांगवायू) होण्याची शक्यता आणि ३) ऑपरेशन यशस्वी होण्याची गॅरंटी देता येत नाही. तथापि आमचा दोघांचा शिवबाबांवर दृढ विश्वास असल्याने, आम्ही डॉक्टर्सना ऑपरेशन करायला परवानगी दिली. सदरचे ऑपरेशन सुमारे ६ तास चालले. त्यावेळी ठाणे, मुलुंड, नाशिक, मालेगाव, हिंगोली व नांदेड येथील ब्रह्मावत्सांनी विशेष योगदान दिले. फलस्वरूप ते ऑपरेशन १००% यशस्वी झाले. विशेष म्हणजे डॉक्टर्सनी वर्तविलेल्या तीन शक्यतांपैकी एकही शक्यता उद्‌भवली नाही. ही सारी शिवबाबांची किमया होती. आजही माझ्या युगलची तब्येत चांगली आहे. त्यामुळे ती देखील ईश्वरी सेवेत पूर्णपणे सहयोगी आहे. तात्पर्य म्हणजे पहाडाएवढी समस्या सुद्धा शिवबाबांच्या कृपेने राईएवढी बनते, हाच माझ्या जीवनाचा अनुभव आहे. त्यामुळे सदैव लक्षात ठेवा की राजयोगाद्वारे कर्मभोगावर सहजच विजय प्राप्त करता येतो. याचेच गायन केले जाते- **'जिसका साथी है भगवान, उसे क्या रोके आँधी और तुफान'।**

या ठिकाणी आणखी एक तिसरा प्रसंग नमूद करावासा वाटतो. माझा मोठा मुलगा ६ महिन्यापूर्वी वाशिम येथे रात्री ८ वाजता मावशीला सोडून टू व्हीलरने घरी परत येत होता; तेव्हा एका वाटसरूला वाचविण्याच्या प्रयत्नात, तो रोडच्या मध्ये फेकला गेला. बराच रक्तस्त्राव झाल्याने, तो जागीच बेशुद्ध पडला. त्यावेळेस तेथून एक ट्रक भरधाव वेगाने चालला होता. परंतु त्या ट्रक ड्रायव्हरने हे दृश्य पाहून क्षणाचाही विलंब न लावता, आपला ट्रक वळवला. तेवढ्यात जवळपासची माणसेही धावून आली व त्यांनी माझ्या मुलाला वाशिम क्रिटीकल सेंटरमध्ये ॲडमिट केले. पुढे तो हॉस्पिटलमध्ये ५ दिवस होता. त्याच्या छातीच्या दोन फासळ्यांना फ्रॅक्चर झाले होते तसेच इतरही जखमा झाल्या होत्या. परंतु लवकरच तो पूर्णपणे बरा झाला. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे त्याला वेळीच मदत मिळाल्याने, त्याचे प्राण वाचले होते. हीसुद्धा शिवबाबांची असीम कृपाच होय.

शिवबाबांच्या मदतीचे असे अनेक अनुभव मी माझ्या जीवनात घेतले आहेत. परिणामतः कुठल्याही परिस्थितीला तोंड देताना मनाची चलबिचल होत नाही. सदैव अचल-अडोल व एकरस स्थिती अनुभवाला येते. त्यामुळेच सर्व वाचक बांधवांना माझी कळकळीची विनंती आहे की त्यांनी आपल्या जीवनात राजयोगाचा अभ्यास अवश्य करावा. जीवनातील कुठलीही परिस्थिती सहज पार करता यावी, यासाठी राजयोग हीच ईश्वरी संजीवनी बूटी आहे. एवढंच नव्हे तर राजयोग ही शिवबाबांच्या छत्रछायेत सदा निश्चिंतपणे, आनंददायी, सुखदायी, खुशनुमा जीवन जगण्याची कला आहे. ■■